# माधवनिदान

# वातव्याधिनिदान अध्याय

## मूळ श्लोक - आतंकदर्पण टीका -

## मधुकोश टीका भाषांतर



डॉ श्रीप्रसाद बावडेकर
स्वास्थ्य निकेतन , पुणे

फेब्रुवारी २०२५

माधवनिदान - वातव्याधिनिदानम्


- प्रकाशक :

वैद्य सौ. लीना बावडेकर

स्वास्थ्य निकेतन

१ ए राधा गोविंद अपार्टमेंटस्

४३३ नारायण पेठ, पुणे ४११०३०

फोन नं. ०२०-२४४९३८६७



- सर्व हक्क प्रकाशकाधिन



- लेखक :

वैद्य श्रीप्रसाद बावडेकर

- प्रथमावृत्ती :

फेब्रुवारी २०२५

- मूल्य : रु. ९९ /-

# भूमिका

माधव निदान प्रथम अध्याय भाषांतर आणि टिप्पणी हे पुस्तक प्रकाशित होऊन अनेक वर्षे झाली. याच पद्धतीने सर्व अध्यायांचे भाषांतर उपलब्ध करून द्यावे अशी सूचना मित्रवर्य डॉ जयंतराव देवपुजारी यांनी केली.

माधव निदान ग्रंथाचे श्लोक आणि टीका यांचे भाषांतर हे मोठे काम आहे. दैनंदिन व्यस्तता सांभाळून ते करणे हा बराच वेळखाऊ उद्योग ठरेल. म्हणून एकावेळी संपूर्ण ग्रंथाचे काम हाती न घेता एकेका अध्यायाचे काम करावे असे ठरवले आणि त्यानुसार ही ई-पुस्तिका लोकार्पण करीत आहे.

या कामात वैद्य मृणाल वर्णेकर यांचे सहकार्य झाले आहे. लेखनाचे ई रूपांतर वैद्य निलेश ढवळे यांनी केले आहे.

# अनुक्रमणिका


- प्रस्तावना ________ १
- वातव्याधी निदान ________ ४
- वातव्याधी पूर्वरूप ________ ९
- वातव्याधी सामान्य लक्षण ________ ११
- कोष्ठाश्रितवात लक्षण ________ १४
- सर्वांगकुपितवात लक्षण ________ १४
- गुदस्थितवात लक्षण ________ १६
- आमाशयस्थवात लक्षण ________ १६
- पक्वाशयस्तवात लक्षण ________ १८
- श्रोत्रादिगतवात लक्षण ________ १८
- त्वग्गतवात लक्षण ________ २०
- असृग्गतवात लक्षण ________ २१
- मांसमेदोगतवात लक्षण ________ २२
- मज्जास्थिगतवात लक्षण ________ २२
- शुक्रस्थवात लक्षण ________ २४
- सिरागतवात लक्षण ________ २५
- स्नायुगतवात लक्षण ________ २५
- संधिगतवात लक्षण ________ २६
- पित्तकफावृत्त प्राणादी लक्षणे ________ २७
- आक्षेपक सामान्यलक्षण ________ ३०
- अपतंत्रक व अपतानक लक्षणे ________ ३२
- दंडापतानक लक्षण ________ ३५
- धनुस्तंभ लक्षण ________ ३६
- अभ्यंतरायाम व बाह्यायाम लक्षणे ________ ३७
- अभिघातज आक्षेपक लक्षण ________ ३९
- अपतानक असाध्य लक्षण ________ ४१
- पक्षवध संप्राप्तिपूर्वक लक्षण ________ ४२
- पक्षवध साध्य-असाध्य विचार ________ ४४
- अर्दित निदान-संप्राप्तिपूर्वक लक्षण ________ ४५
- अर्दित असाध्य लक्षण ________ ४८
- आक्षेपकादि वेगशांति लक्षण ________ ५०
- हनुग्रह लक्षण ________ ५१
- मन्यास्तंभ लक्षण ________ ५३
- सिराग्रह संप्राप्तिपूर्वक लक्षण ________ ५४
- गृध्रसी लक्षण ________ ५५
- विश्वाची लक्षण ________ ५७
- क्रोष्टुकशीर्ष लक्षण ________ ५९
- खंज लक्षण ________ ६०
- कलायखंज लक्षण ________ ६१
- वातकंटक लक्षण ________ ६२
- पाददाह लक्षण ________ ६३
- पादहर्ष लक्षण ________ ६४
- अंसशोष लक्षण ________ ६५
- अवबाहुक लक्षण ________ ६६
- मूकादी लक्षण ________ ६८
- तूनी लक्षण ________ ७०
- प्रतितूनी लक्षण ________ ७१
- आध्मान व प्रत्याध्मान लक्षण ________ ७२
- अष्ठीला व प्रत्यष्ठीला लक्षण ________ ७४
- बस्ति प्रतिलोम वायु लक्षण ________ ७६
- खल्ली व ऊर्ध्ववात लक्षण ________ ७७
- पूर्वोक्त वातरोग साध्यासाध्यता व उपद्रव ________ ७९
- प्रकृतिस्थ वायू लक्षण व कार्य ________ ८०
- पुष्पिक ________ ८१

# प्रस्तावना

रोगविनिश्चय हा आयुर्वेदीय निदान या विषयाचा संकलन ग्रंथ आहे. मूळ नाव रोगविनिश्चय असले तरी व्यवहारात मात्र संकलनकार - संपादक श्री माधवकर यांच्या नावानेच या ग्रंथाची प्रसिद्‌धी झाली आहे.

चरक सुश्रुत वाग्भट या बृहत्त्रयीतील निदानविषयक सूत्रांचे अत्यंत नेमके नेटके संपादन हे या ग्रंथाचे वैशिष्य आहे. तशा अर्थाने हा एक प्रकरण ग्रंथ ठरतो. जे स्थान न्यायशास्राच्या अभ्यासकांसाठी तर्कसंग्रहाचे आहे किंवा मीमांसेच्या अध्ययनासाठी अर्थसंग्रह हा प्रकरण ग्रंथ आहे तसेच स्थान माधवनिदानाला आयुर्वीय निदान या संदर्भात प्राप्त आहे.

नेटके संपादन या वैशिष्ट्याशिवाय बृहत्त्रयीतील अनुक्त व्याधीचा विमर्श हे माधवनिदानाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे.

मूळ ग्रंथकाराने त्याच्या समोर असणाऱ्या वाचकवर्गाला उचित अशा प्रकारे रचना केली असली तरी ग्रंथाचा विस्तार प्रसार जसा भौगोलिक स्तरावर पसरतो. तसाच कालिक स्तरावरही पसरतो. त्यामुळे मूळ ग्रंथकार आणि विभिन्न देशातील - काळातील वाचकवर्ग यामध्य एक प्रकारचे अंतर पडते आणि ते वाढतच रहाते. ते अंतर कमी करण्यासाठी टीकाकार मदत करतात.

माधवनिदान हा प्रायः हा संकलनात्मक ग्रंथ असला तरी ते यादृच्छिक संकलन नाही. ग्रंथकाराने आयुर्वेदिक निदान चिकित्सेचे कार्य केलेले आहे. अनुभव घेतलेला आहे आणि त्या अनुभवाच्या आधारे समन्वित असे संकलन-संपादन केलेले आहे. ग्रंथ वाचत असताना याचा अनुभव येत असतो.

असे असल्यामुळे हा ग्रंथ - त्यातील प्रकरणे ही माधवकराची अभिव्यक्ती म्हणून पाहिली पाहिजेत आणि अभ्यासली पाहिजेत. ती अभिव्यक्ती चरक व अन्य संहितांच्या परिप्रेक्ष्यात पाहणे उचित ठरणार नाही. यादृष्टीने वातव्याधी निदानाकडे पाहताना ‘बली’ असा वात विविध व्याधी ‘करोति’ म्हणजे उत्पन्न करतो ही प्राथमिक भूमिका संपूर्ण अध्यायभर गृहीत आहे. ‘बली’ आणि ‘करतो’ या संकल्पना समजावून घेऊ. बली याचा शब्दशः अर्थ बलवान. अमूर्त वात बली होतो म्हणजे त्याच्या गुणांचा एक-दोन वा अधिक गुणांचा स्वाभाविकपेक्षा अधिक परिपोष होतो.

विरळ परमाणू निबिड संघातरूपात एकत्र येतात. वात चल स्वभावाचा असल्याने गती हा परिणाम वाढतो.

जसा सृष्टीत वावटळ, चक्रीवादळ, घोंगावणारा वारा अशाप्रकारे वात अभिव्यक्त होतो तसाच तो विविध प्रकारे शरीरात अभिव्यक्त होतो.

हा वात 'बली' आहे, तो नुसताच ताकतवान आहे. तो 'प्रधान' नाही म्हणजे त्याचा स्वतःवर वा इतरांवर ताबा नाही. सृष्टीत एखादा मत्त हत्ती इतस्ततः उधळावा आणि त्याचे ते मदरूपी बल शांत झाल्यावरच तो शांत व्हावा तद्वत हा वाद आहे. जेथे 'रिक्तानि श्रोतांसि' दिसतील तेथे तो घुसणार आहे.

'प्रधान' असतो त्याच्याकडे इतरांवर हुकुमत चालवण्याची क्षमता असते. जसे एखाद्या शासकीय अधिकाऱ्याचे अंगरक्षक असतात ते 'बली' असतात - असावे लागतात तथापि तो शासकीय अधिकारी 'प्रधान' असतो कारण तो त्या बलीवर ताबा ठेवू शकतो.

या परिप्रेक्ष्यात 'प्रधान' दोष (जसे पित्तप्रधानैः दोषैस्तु - पाण्डु संप्राप्ति) आणि बलवान दोष या संकल्पना समजावून घेतल्या पाहिजेत.

पुढचा भाग म्हणजे 'करतो' ही संकल्पना. येथे वायू स्वतः व्याधी उत्पन्न करू शकतो हे लक्षात घेतले पाहिजे. वात अमूर्त असला तरी त्यामध्ये विविध दुःख उत्पन्न करण्याची क्षमता आहे हे स्पष्ट आहे.

आता बली वायू या संकल्पनेतच काही बाबी अंतर्भूत आहेत. षट्क्रियाकालाच्या अनुषंगाने पाहिले तर वायू बली होणे हे प्रकोपसूचक आहे. म्हणजेच चय या अवस्थेची वैद्याने किंवा रुग्णाने उपेक्षा केली आहे हे गृहीत आहे. त्यामुळे वातविकारांचा इतिहास पाहताना वातचयकर हेतूंचीही प्रश्नपरीक्षा आणि वातचय लक्षणांची दर्शन स्पर्शनादि परीक्षा हा भाग गृहीत धरला पाहिजे.

माधवकराने पूर्वरूपाची भूमिका सामान्य रूपाने प्रथमाध्यायात स्पष्ट केलेलीच आहे. येथे प्रकरण संदर्भात वातव्याधींची पूर्वरूपे याविषयी विशेष भूमिका स्पष्ट केली आहे (श्लोक ५). पुढे श्लोक ६ ते ९ येथे बली वाताची व्याधीरूपाने अभिव्यक्ती कशाप्रकारे होते याची काही प्रतिनिधिक उदाहरणे देऊन हेतूस्थानविशेषाच्च भवेद्रोगविशेषकृत् ही लेशोक्ताची सूचना दिली आहे.यानंतर काही संकल्पना समजावून घेऊ. कोष्ठाश्रित, असृग्गत अशी वर्णने पुढे उपलब्ध होतात. येथे 'श्रित', 'स्थित', 'गत' या यादृच्छिक किंवा पर्यायवाची संज्ञा नाहीत हे वाचकाला स्पष्ट असले पाहिजे.

कोष्ठाश्रित वात कुपित होणे म्हणजे वाताचे जे स्वाभाविक स्थान आहेच - पक्वाशय, कटी, सक्थिः - या श्लोकात वर्णन केलेले, त्यातील वात कुपित होणे. म्हणजे तो कुपित वात अन्यत्र जाऊन नव्हे तर स्वतःच्याच जागेत कुपित होऊन जागा व्यापू लागतो आणि गुणविकल्पनेनुसार - हेतुविकल्पनेनुसार परिणाम घडवतो. येथे कोष्ठ याची व्याप्ती 'नाभिस्तनान्तर' ही लेशोक्त अधिकारात गृहीत धरावी. गत याचा अर्थ स्वाभाविक स्थानात कुपित होऊन अन्यत्र जाऊन परिणाम घडवणे, जसे 'मांसमेदोगतेऽनिले' (श्लोक १७)

आवरण ही सर्वथा स्वतंत्र कल्पना आहे येथे त्यावर अधिक विवरण करणे अभिप्रेत नाही. वैद्य रमेश नानल यांचे आवरण विषयावरील अनुभूत आणि अभ्यासपूर्ण लेखन उपलब्ध आहे. ['आवरण' पुस्तिका. माधवी प्रकाशन. मुंबई]

अगदी संक्षेपात सांगायचे तर बली वाताला त्याच्याही पेक्षा बलवान वा प्रधान पित्त कफाने अडवणे किंवा गुंडाळून टाकणे असा एक आवरणाचा प्रकार आहे. येथे अर्थातच बली-अमूर्त वाताला अडविण्याची क्षमता असणारे मूर्त पित्त-कफ त्या प्रमाणात अधिक बलवान व प्रधान झालेले असणे अभिप्रेत आहे. यातूनच आपल्याला हेतूंचा मागोवा घेणे स्पष्ट होणार आहे आणि चिकित्सेची दिशाही स्पष्ट होणार आहे किंबहुना आदौ आवरकं दोषं आवृतं तदनंतरम् - या सूत्राने ती स्पष्ट केलेली आहे.

बली वाताच्याच एखाद्या प्रकाराने एखाद्या कमी बलवान वाताला झाकून टाकणे किंवा त्याचा गतिरोध करणे हा वातप्रकाराकडून वात प्रकाराला झालेला आवरणप्रकार म्हणून समजावून घेतला पाहिजे. त्यानुसार अशा आवरणांच्या अभिव्यक्तीची दिशा, काळ यांचा विचार केला पाहिजे.

एकूण वातव्याधी निधानाचा अभ्यास करताना एवढी भूमिका स्पष्ट असली तर वाचनाची उपयुक्तता वाढेल.विजयरक्षिताची मधुकोष आणि आतंकदर्पण या दोन्ही टीका उपलब्ध आहेत. त्या टीकाकारांनी आपापल्या परिप्रेक्ष्यातून भाष्य केले आहे. त्यातून किमान स्पष्टता होतेच शिवाय विचारांच्या इतर दिशा स्पष्ट होतात.

[टीकावाचन कसे करावे यासंबंधी स्वतंत्र लेख - www.charakashree.com - येथे उपलब्ध आहे. तो जरूर अभ्यासावा.]

इति शम्

वैद्य श्रीप्रसाद बावडेकर.

वातरोगस्य निदानं सम्प्राप्तिश्च

वातरोगाचे निदान व संप्राप्ति (सांगतो.)

अथ वातव्याधिनिदानम्|

आता वातव्याधीनिदान (सांगतो.)

रूक्षशीताल्पलघ्वन्नव्यवायातिप्रजागरैः |
विषमादुपचाराच्च दोषासृक्स्रवणादपि ||१||
लङ्घनप्लवनात्यध्वव्यायामादिविचेष्टितैः |
धातूनां सङ्क्ष्याच्चिन्ताशोकरोगातिकर्षणात् ||२||
वेगसन्धारणादामादभिघातादभोजनत् |
मर्माबाधाद्गजोष्ट्राश्वशीघ्रयानापतंसनात् ||३||
देहे स्रोतांसि रिक्तानि पूरयित्वाऽनिलो बली |
करोति विविधान् व्याधीन् सर्वाङ्गैकाङ्गसंश्रयान् ||४||
(च. चि. अ. २८) |

रूक्ष-शीत-अल्प, अल्पमात्रेतील अन्न, अति व्यवाय, अति जागरण, विषम उपचार, दोषांचे (विषम) संशोधन आणि (विषम रक्तस्रवण, लंघन, अति पोहणे, अति चालणे, अति व्यायाम इ. प्रकारच्या शारीरिक हालचाली, धातूंचा क्षय, चिंता - शोक - रोग यामुळे झालेले अतिकर्षण, वेगसंधारण, आम, अभिघात, अनशन, मर्माघात, हत्ती-घोडा (इत्यादी) यावरून गतिमान प्रवास करत असताना पडणे (अशा सर्व कारणांमुळे) (कुपित झालेला) बलवान वायू शरीरातील रिक्त स्रोतसे भरून टाकतो, (आणि) सर्वांगसंश्रित किंवा एकांगसंश्रित असे विविध व्याधी (उत्पन्न) करतो.

आ.द. - सुश्रुते दोषाणां वात एव प्रधानः| उक्तं च– “पित्तं पङ्गु कफः पङ्गुः पङ्गवो मलधातवः| वायुना यत्र नीयन्ते तत्र वर्षन्ति मेघवत्||” इति| अतो वातव्याध्यभिधानम्| तस्य सम्प्राप्तिपूर्वकं निदानमाह– रूक्षेत्यादि| अल्पं स्तोकं, लघ्वन्नं पुरातनं षष्टिकादि, व्यवायो मैथुनं, प्रजागरणं रात्रिजागरणम्| विषमादुपचारादिति अप्राप्ते क्रियाकाले क्रियाक्रमः| दोषासृक्स्रावणादपि वमनविरेकाभ्यां दोषस्यातिरेकात् रुधिरस्रवणात्| लङ्घनमुत्पतनं, प्लवनं बाहुभ्यां तरणम्| , रोगादिकर्षणम्, अत्रादिना अध्वज्वरादिष्वतिलङ्घनम्| आमात् आमरसात्, तस्य कारणत्वं मार्गावरणद्वारेण, न तु स्वरूपेण| अभिघातो लगुडादिभिः| अभोजनादुपवासात्| मर्माबाधात् मर्माभिघातात्| अपतंसनं पतनं गजादिभ्यः, तथा शीघ्रयानादिभिः| एतैः कारणैः कुपितो बली वायू रिक्तानि स्रोतांसि पूरयित्वा सर्वाङ्गैकाङ्गजान् व्याधीन् करोति||१-४||

सुश्रुतामध्ये दोषांपैकी वातच प्रधान (मानला आहे.) म्हटलेच आहे -
“पित्तं पङ्गुः कफः पङ्गुः पङ्गवो मलधातवः ।
वायुना यत्र नीयन्ते तत्र वर्षन्ति मेघवत् ।।”

म्हणून वातव्याधी सांगत आहेत. त्यांचे सम्प्राप्ति सह निदान सांगतात रूक्ष इत्यादी. अल्प म्हणजे थोडे. लघ्वन्न (म्हणजे) जुने षष्टी-शाली इत्यादी, व्यवाय (म्हणजे) मैथुन, प्रजागर (म्हणजे) रात्रीचे जागरण. विषमाद् उपचाराद् (म्हणजे) क्रियाकाल प्राप्त झालेला नसताना शोधनादि क्रिया करणे. दोषासृक् स्रवणात् (म्हणजे) वमन-विरेचन यांनी अतिमात्रेत दोषनिर्हरण आणि रक्तहरण. अभिघात म्हणजे सोटा / काठी इत्यादींनी झालेला आघात. अभोजनात् (म्हणजे) उपवासामुळे. मर्माबाध म्हणजे मर्मांवर झालेला अभिघात. या कारणांनी कुपित झालेला बलवान वायु रिक्त स्रोतसांचे पूरण करून सर्वांगज किंवा एकांगज (व्याधी) उत्पन्न करतो.

अपस्मारवद्वातविकाराणामप्याक्षेपकादीनां वेगकर्तृत्वादपस्मारानन्तरं वातव्याध्यारम्भः| ननु, वातव्याधिरिति कोऽर्थः? किं वात एव व्याधिर्वातव्याधिः, उत वातेन जनितो व्याधिर्वातव्याधिः? आद्ये स्वस्थेष्वपि प्रसङ्गः, द्वितीये ज्वरादिषु| उच्यते– व्याधिपदसामानाधिकरण्याद्विकृतो दुःखकारी वातो वातव्याधिः| उक्तं हि सुश्रुते– “पक्वाशयस्थोऽन्त्रकूजं शूलाटोपौ करोति च|” (सु. नि. अ. १) इति| वातजनितोऽसाधारणव्याधिर्वातव्याधिरिति विशेषणीयं, तेनोभयत्राप्रसङ्गः| यच्चोक्तम्– “कफपित्तान्वितो वायुर्वायुरेव च केवलः| कुर्यादाक्षेपकम्” इत्यादि; तत्रारम्भको वायुरेव, पित्तकफौ त्वनुबन्धाविति न विरोधः स्यात्| चरके हि द्विविधा व्याधय उक्ताः सामान्यजा, नानात्मजाश्चेति; तत्र सामान्यजा ये वातादिभिः समस्तैर्व्यस्तैर्वा जन्यन्ते, यथा– ज्वरादयः; नानात्मजा ये नियतैकदोषजन्याः, यथा – आक्षेपकादयो ये वातेनैव जन्यन्ते, न स्वतन्त्रेण पित्तेन कफेन वा; तथा ओषचोषादयः पित्तेनैव, न वातेन कफेन च तथा तृप्त्यादयः कफेनैव, न वातेन, न पित्तेन,; एवं व्यवस्थिते वातव्याधिवत् पित्तकफव्याधी कस्मान्नोक्तौ? उच्यते– वायोरतिबलत्वेन आशुकारित्वेन च गरीयस्त्वात्तद्विकाराणां दुःसाध्यत्वादाश्वेवात्ययकरत्वाद्विशिष्टचिकित्स्यत्वाद्वातव्याध्यभिधानं, नतु कफपित्तव्याध्यभिधानम्| अत एव चरकसुश्रुतादिष्वपि वातरोगाध्याय एव निर्दिष्टो, नतु पित्तकफरोगाध्यायः| चन्द्रिकाकारस्त्वाह– पित्तकफयो रूपरसादियोगाद्दूष्यविशेषयोगाद्वा हरिद्राचूर्णसंयोगवदत्यन्तविसदृशा रसादिमन्तो विकाराः पृथङ्नामानो जायन्ते, वायोस्तु रूपरसाद्यभावात् दूष्यनिरपेक्षा आक्षेपकादयो वातादनतिभिन्नरूपा नानात्मजाः; तेन वातविकाराः पृथगुच्यन्ते, नतु पित्तकफविकारा इति| एतत्तु बकुलकरप्रभृतया नानुमन्यन्ते, चरकविरोधात्| चरके हि पित्तकफयोरपि नानात्मजा उक्ताः, यथा – ‘अशीतिर्वातविकाराः, चत्वारिंशत् पित्तविकाराः, विंशतिः श्लेष्मविकाराः|’ (च. सू. अ. २०) इति| सुश्रुतेन तु शल्याध्यायिना पित्तकफनानात्मजा न दर्शिताः, पराधिकारेषु न विस्तारोक्तिरित्यभिप्रायेणेति| लङ्घनमुत्पतनम्, उपवासस्यानशनशब्देन वमनादेश्च दोषस्रवणशब्देन वक्ष्यमाणत्वात्| प्लवनं बाहुभ्यां जलप्रतरणम्| आमादिति आमरसात्, तस्य कारणत्वं मार्गावरणद्वारेण नतु स्वरूपेण; आयासादिति पाठान्तरमयुक्तं, तस्य व्यायामशब्देनोक्तत्वात्| मर्माबाधात् मर्माभिघातात्| अपतंसनं गजादिभ्यः शीघ्रयानेन पतनम्, उच्छ्वासावरोधो वा; धातुकर्षणमिति खरनादः||१-४||

अपस्माराप्रमाणे आक्षेपकादि वात विकारांमध्ये ‘वेग’ उत्पन्न करण्याची क्षमता असल्यामुळे अपस्मारानंतर वातव्याधींना आरंभ केला आहे. खरेखर वातव्याधी याचा काय बरे अर्थ ? वात हाच व्याधी म्हणजे वातव्याधी का? अथवा वाताने झालेला व्याधी म्हणजे वातव्याधी का ? पहिला (पक्ष मानला) तर स्वस्थाला सुध्दा (वातव्याधित म्हणावे लागेल.) दुसरा (पक्ष मानला) तर ज्वरादींना (वातव्याधी म्हणावे लागेल.)

सांगतो - व्याधी हे समानाधिकरण पद असल्यामुळे विकृत- दुःखकर वात म्हणजे वातव्याधी. सुश्रुतामध्ये म्हटलेच आहे - "पक्काशयस्थोऽन्त्रकूजं शूलाटोपौ करोति च ।"

वातजनित असाधारण व्याधी (म्हणजे) वातव्याधी. हा त्यातील विशेष आहे. त्यामुळे (वर वर्णन केलेले) दोन्ही पक्ष संभवत नाहीत. जे म्हटले आहे - "कफपित्तान्वितो वायुर्वायुरेव च केवलः । कुर्यादाक्षेपकम्" ।

तेथे वात हा आरंभक आहे आणि पित्त-कफ हे अनुबंध आहेत, त्यामुळे विरोध (उत्पन्न होत) नाही.

चरकामध्ये दोन प्रकारच्या व्याधी सांगितल्या आहेत. सामान्यज आणि नानात्मज. सामान्यज म्हणजे वात इत्यादी सर्व किंवा दोन यांचे मुळे उत्पन्न होतात. जसे ज्वरादी. नानात्मज (म्हणजे जे एकदोषजन्य असेच नियत) असतात. जसे आक्षेपकादी- जे केवळ वातानेच होतात - स्वतंत्र कफाने किंवा पित्ताने नाही. त्याचप्रमाणे चोष इत्यादी, पित्तानेच होतात, वाताने किंवा कफाने नाही, त्याचप्रमाणे तृप्ती इ. कफानेच होतात. वाताने किंवा पित्ताने नाही.

अशी व्यवस्था असेल तर वातव्याधींप्रमाणे पित्तकफ व्याधी का सांगितले नाहीत? सांगतो - वात अति बलवान - आशुकारी असल्यामुळे विकार - मोठे/गंभीर (होतात.) दुःसाध्य (होतात.) गतीने अत्येय उत्पन्न करतात आणि त्यांची चिकित्सा विशेष असते. म्हणून वातव्याधी (स्वतंत्रपणे) सांगितले आहेत. मात्र कफपित्त व्याधी (असे वर्णन) नाही. म्हणूनच चरक-सुश्रुत इ. मध्ये सुद्धा वातरोग अध्याय सांगितला आहे. पित्त-कफ-रोग अध्याय नाही.

चंद्रिकाकार म्हणतात - पित्त कफांच्या रूप रसादींच्या मुळे - दूष्य विशेषांशी संयुक्त होण्यामुळे, हळद आणि चुना संयोगाप्रमाणे अत्यंत विसदृश, रसादींचे - वेगवेगळ्या नावाचे विकार उत्पन्न होतात. वाताला रूप-रस नसल्यामुळे दूष्य-निरपेक्ष असे आक्षेपकादि - फार भिन्न न दिसणारे नानात्मज व्याधी (उत्पन्न होतात.) म्हणून वातविकार वेगळे सांगतात, पित्त-कफ विकार नाही.

हे (मत) बकुलकर इ. मान्य करत नाहीत- चरकाला विरोध होत असल्यामुळे. चरकामध्ये पित्त-कफाचे सुध्दा नानात्मज (विकार) सांगितले आहेत. जसे -
“अशीतिर्वातविकाराः, चत्वारिंशत् पित्तविकाराः, विंशतिः श्लेष्मविकाराः ।”
सुश्रुताने मात्र शल्याचे अध्ययन करीत असल्यामुळे पित्तकफ नानात्मज दाखविले नाहीत. “पराधिकारेषु न विस्तरोक्तिः” या अभिप्रायामुळे.

लंघन म्हणजे पडणे, उपवास, अनशन शब्दाने अनशन सांगितले असल्यामुळे, दोषस्रवण शब्दाने वमनादि सांगितलेले असल्यामुळे. प्लवन म्हणजे हाताने पोहणे. आम म्हणजे ‘आम’ रस, त्याचे हेतुत्त्व त्याच्या स्वरुपामुळे नव्हे तर मार्गावरोधाद्वारा (असे समजून घेतले पाहिजे.) ते व्यायाम शब्दाने सांगितलेले असल्यामुळे. मार्गावरोध द्वारा हा पाठ योग्य नाही. मर्माघातात् म्हणजे मर्मावर अभिघात झाल्यामुळे. अपतंसन म्हणने हत्ती इ. गतिमान वाहनावरून पडणे किंवा उच्छ्वासाचा अवरोध होणे. (हत्तीवरून गतिमान प्रवासजन्य) धातुकर्षण असे (खरनाद म्हणतो.)

# वातव्याधेः पूर्वरूपादयः

वातव्याधीची पूर्वरूपे इत्यादी (सांगतो.)

अव्यक्तं लक्षणं तेषां पूर्वरूपमिति स्मृतम् |
आत्मरूपं तु यद्व्यक्तमपायो लघुता पुनः ||५||
(च. चि. अ. २८) |

त्याचे अव्यक्त लक्षण (म्हणजे) पूर्वरूप ओळखावे (आणि) जे व्यक्त होईल ते आत्मरूप (समजावे.) (आणि लक्षणांचा) अभाव हे लघुता असे (समजावे.)

आ.द. -
मधुकोश - पूर्वरूपादिकमाह– अव्यक्तमित्यादि| अव्यक्तमिति वक्ष्यमाणानां वातविकाराणां रूपमेवाव्यक्तं पूर्वरूपं, नतु ज्वरादिवद्विशिष्टमन्यत्| आत्मरूपमित्यादि तदेव व्यक्तमात्मरूपं दोषादिभेदेन सम्यक् प्रकाशितं स्वलक्षणमित्यर्थः| अपाय इति वायोश्चलत्वेन स्तम्भसङ्कोचकम्पादीनां कदाचिदभावात्; यदुक्तम्– "गते वेगे भवेत् स्वास्थ्यं सर्वेष्वाक्षेपकादिषु|" इति लघुतेति शरीरस्य, वायुना सर्वधातुशोषणात्| अथवा अपायो लघुता इति सर्ववातविकाराणामपायोऽभावः, किं तदित्याह – लघुतेति; वातलिङ्गानां लघुताऽत्यल्पत्वेनावस्थानं नतु निःशेषनिवृत्तिः; यथा – बहिरायामनिवृत्तावपि न रूक्षत्वादिनिवृत्तिरित्याहुः||५||

पूर्वरूपादि सांगतो - अव्यक्त इ. अव्यक्त म्हणजे, वर्णन केलेल्या वातविकारांचे रूपच जे अव्यक्त असते, ते पूर्वरूप. ज्वर इ. प्रमाणे वेगळे, विशेष असे नाही. आत्मरूप म्हणजे तेच व्यक्त आत्मरूप (जे) स्वलक्षण म्हणून दोषादि भेदाने प्रकाशित (झालेले) आहे. अपाय म्हणजे वायूच्या चलत्वामुळे स्तंभ, कंप, संकोच इ. चा कदाचित अभाव असे म्हटले आहे.
"गते वेगे भवेत् स्वास्थ्यं सर्वेष्वाक्षेपकादिषु|"

लघुता - शरीराची, वायूने सर्व धातूंचे शोषण केल्यामुळे. किंवा अपायो लघुता म्हणजे सर्व वात विकारांचा अपाय - अभाव. तो कोणता ते सांगतात - लघुता इ.. वात लक्षणांची लघुता (म्हणजे) अत्यल्प अशी स्थिती (मात्र) संपूर्ण निवृत्ती नव्हे. जसे बहिरायाम (लक्षण) निवृत्त झाले तरी रुक्षत्वादी (लक्षणे) निवृत्त होत नाहीत त्याप्रमाणे.

वातव्याधेः सामान्यलिङ्गं, वायोर्हेत्वादिविशेषाद्रोगविशेषकर्तृत्वं च

वातव्याधीची सामान्य लक्षणे (आणि) हेत्वादिच्या विशेषानुसार रोगकर्तृकत्व (सांगतात.)

सङ्कोचः पर्वणां स्तम्भो भङ्गोऽस्थ्नां पर्वणामपि |
रोमहर्षः प्रलापश्च पाणिपृष्ठशिरोग्रहः ||६||
खाञ्ज्यपाङ्गुल्यकुब्जत्वं शोथोऽङ्गानामनिद्रता |
गर्भशुक्ररजोनाशः स्पन्दनं गात्रसुप्तता ||७||
शिरोनासाक्षिजत्रूणां ग्रीवायाश्चापि हुण्डनम् |
भेदस्तोदोऽर्तिराक्षेपो मुहुश्चायास एव च ||८||

संकोच, पेरांचा स्तंभ, अस्थींचा आणि पेरांचा भंग, रोमहर्ष, प्रलाप, हात, पाय, शिर यांचा ग्रह, खंजता, पंगुता, कुब्जता, अवयवांचा शोथ, अनिद्रा, गर्भ, शुक्र, रज यांचा नाश, स्पन्दन, शरीरावयवात सुप्तता, शिर-नासा-अक्षि-जत्रु (वक्ष) हुंडन, भेद, तोद, रुजा, आक्षेप आणि वारंवार श्रम.

कुपितवायोः हेतुस्थानविशेषात् रोगविशेषकर्तृत्वम्

कुपित वाताचे हेतुस्थानविशेषामुळे रोगविशेषकर्तृकत्व.

एवंविधानि रूपाणि करोति कुपितोऽनिलः |
हेतुस्थानविशेषाच्च भवेद्रोगविशेषकृत् ||९||
(च. चि. अ. २८) |

अशा प्रकारची रूपे कुपित वायू (उत्पन्न) करतो. (आणि) हेतू आणि स्थान यांच्या विशेषानुसार रोग विशेष (उत्पन्न) करतो.

आ.द. - सङ्कोचः पर्वणां, स्तम्भश्च पर्वणामेव, अस्थ्नां भङ्गः स्फुटनं, तथा पर्वणां पाण्यादीनां ग्रहः स्तम्भ इव| खाञ्ज्यं खञ्जता, पाङ्गुल्यं पङ्गुता|


संकोच पर्वांचा, अस्थिभंग म्हणजे स्फुटन, त्याचप्रमाणे पर्व आणि हात यांचा ग्रह म्हणजेही स्तंभ. खाञ्ज्य म्हणजे खंजता. तोद आणि शूल हे पीडेचे भेद आहेत.

मधुकोश - करोति विविधान् व्याधीनिति यदुक्तं तद्व्याकरोति– सङ्कोच इत्यादि| स्तम्भः पर्वणामेव| पाङ्गुल्यं पङ्गुता| शोथोऽङ्गानामिति बाहुमुखादीनाम्| अनिद्रतेत्यनेन अल्पनिद्रतेत्याहुः| गर्भशुक्ररजोनाश इति गर्भशय्याया वाताधिष्ठितत्वेन गर्भाग्रहणमिति जेज्जटः| गर्भादिविकृतिरप्यत्र द्रष्टव्या| स्पन्दनं कम्पनम्| हुण्डनं शिरःप्रभृतीनामन्तःप्रवेशो वक्रत्वं वा, धातूनामनेकार्थन्त्वात्| अन्ये त्वाहुः– शिरोहुण्डनं केशभूमिस्फुटनं शङ्खललाटभेदश्च, नासाहुण्डनं घ्राणनाशः, अक्षिहुण्डनमक्षिव्युदासः, जत्रुहुण्डनं वक्षोपरोधः, ग्रीवाहुण्डनं ग्रीवास्तम्भः| भेद इति ओष्ठदन्तश्रोण्यादीनाम्| तोदः शूलम्| अर्तिः पीडा, सा च पादपार्श्वश्रोत्राक्षिवक्षसामिति जेज्जटः| आक्षेपश्च आक्षेपकादिषु वक्ष्यमाणः| आयासः श्रमः||६-८||

हेत्वित्यादि| हेतुविशेषः आवरणादिः यथा – श्लेष्मावृतो मन्यास्तम्भकारी; स्थानविशेषः कोष्ठादिः; यथा– पक्वाशयस्थोऽन्त्रकूजनमित्यादि||९||

करोति विविधान् व्याधीन् हे जे सांगितले आहे, त्याचे वर्णन करतात. संकोच इ. स्तम्भ हा पर्वांचाच (संभवतो.) पाङ्गुल्य म्हणजे पङ्गुता. शोथो अङ्गानाम् म्हणजे चेहरा, हात इ, चा. अनिद्रता या शब्दाने अल्पनिद्रता सांगितली आहे. गर्भशुक्ररजोनाश म्हणजे जेज्जटाच्या मते गर्भशय्येवर वात अधिष्ठित झाल्याने गर्भाचे ग्रहण न होणे, येथे गर्भादींची विकृती सुध्दा पहावी (समजून घ्यावी.) स्पन्दन म्हणने कंपन. हुंडन म्हणजे शिर इ. मध्ये (वाताचा) प्रवेश किंवा वक्रत्व. धातूंचे अनेक अर्थ असल्यामुळे (हे समजून घ्यावे.) अन्य (लोक) म्हणतात, शिरोहुंडन म्हणजे केशभूमीचे स्फुटन, शंख, ललाट यांचा भेद. नासा हुंडन म्हणजे घ्राणेन्द्रियाचा नाश. अक्षिहुंडन म्हणजे डोळ्यांचा व्युदास. जत्रुहुंडन म्हणजे वक्ष उपरोध. ग्रीवा हुंडन म्हणने ग्रीवा स्तम्भ. भेद हा ओठ, दात, श्रोणी इ. चा (समजावा.) तोद म्हणजे शूल, अर्तिः म्हणजे पीडा - ती जेज्जटाच्या मते पाय, बरगड्या, छाती यांची. आक्षेप म्हणजे आक्षेपकादींमध्ये सांगितलेली (अवस्था). आयास म्हणजे श्रम.

हेतू इ. बद्दल (सांगतात.) हेतू विशेष म्हणजे आवरण इ. जसे - श्लेष्मावृत्त (वायु) मान्यस्तंभ करणारा; स्थानविशेष म्हणजे कोष्ठ इ.; जसे - पक्काशयस्थ वायु आंत्रकूजन (करणारा) इत्यादी.



# कोष्ठाश्रितवातलक्षणं, सर्वाङ्गकुपितवातलक्षणं च

कोष्ठाश्रितवात लक्षण व सर्वाङ्गकुपितवात लक्षण (सांगतात.)

तत्र कोष्ठाश्रिते दुष्टे निग्रहो मूत्रवर्चसोः |
ब्रध्नहृद्रोगगुल्मार्शःपार्श्वशूलं च मारुते ||१०||
सर्वाङ्गकुपिते वाते गात्रस्फुरणभञ्जनम् |
वेदनाभिः परीताश्च स्फुटन्तीवास्य सन्धयः ||११||
(च. चि. अ. २८) |

तेथे कोष्ठाश्रित दुष्ट वातामुळे मूत्र, मलाचा निग्रह (होतो.) ब्रध्न, हृद्रोग, गुल्म, अर्श आणि पार्श्वशूल (हेही) होतात. सर्वांग कुपित वातामुळे गात्रांचे स्फुरण, भंग आणि वेदानांनी युक्त (अशा प्रकारे) संधि स्फोट (होतो.)

आ.द. - स्थानविशेषमाह– तत्रेत्यादि| तत्र तेषु स्थानेषु मध्ये कोष्ठाश्रिते वाते दुष्टे सति मूत्रवर्चसोर्निग्रहस्तथा ब्रध्नादयो रोगा भवन्ति| कोष्ठशब्देनात्र आमाशयादयः सर्वे गृह्यन्ते| यदुक्तम्– "स्थानान्यामाग्निपक्वानां मूत्रस्य रुधिरस्य च| हृदुण्डुकः फुप्फुसश्च कोष्ठमित्यभिधीयते" इति| आमाशयादिगतं तु पृथगपि वक्ष्यति| निग्रहोऽप्रवृत्तिः| ब्रध्नः कोशवङ्क्षणसन्धिः| सर्वाङ्गकुपितलक्षणमाह– सर्वाङ्गेत्यादि| भञ्जनं भङ्गवत्पीडेत्यर्थः| सन्धयो वेदनया परीता युताः स्फुटन्तीव||१०-११||


स्थानविशेष सांगतात. तत्र इ. त्या स्थानांमध्ये पैकी, कोष्ठाश्रित वात दुष्ट झाला असत्ता, मूत्र, मल यांचा निग्रह आणि ब्रध्न इ. रोग होतात. कोष्ठ शब्दाने येथे आमाशयादि सर्व गृहित आहेत जे म्हटले आहे - "स्थानान्यामाग्निपक्वानां मूत्रस्य रुधिरस्य च| हृदुण्डुकः फुप्फुसश्च कोष्ठमित्यभिधीयते".

सर्वांग कुपित वाताचे लक्षण सांगतात- सर्वांग इ. भंजन म्हणजे भंग झाल्याप्रमाणे पीडा. संधी वेदनांनी युक्त अशा प्रकारे फुटल्याप्रमाणे (वेदना होतात.)

मधुकोश - एतदेव विवृणोति (कोष्ठाश्रितवातलक्षणमाह)– तत्रेत्यादि| कोष्ठशब्देनाविशेषात् सर्वे आमाशयादयो गृह्यन्ते, आमाशयादिगं तु पृथगपि वक्ष्यति| निग्रहोऽप्रवृत्तिः| ब्रध्नः कोशवङ्क्षणसन्धिः||१०-११||

याचेच वर्णन करतात. (कोष्ठाश्रित वाताचे) तत्र इत्यादी. कोष्ठ शब्दाने अविशेष अशा प्रकारे आमाशयादी सर्व गृहित धरतात. आमाशयादिगत चे वर्णन स्वतंत्रपणे ही सांगतात. निग्रह म्हणजे अप्रवृत्ती. ब्रध्न म्हणजे वंक्षणसंधीतील कोष.

## गुदस्थितवातलक्षणम् आमाशयस्थवातलक्षणं च



गुदस्थितवात लक्षण व आमाशयस्थवात लक्षण (सांगतात.)

ग्रहो विण्मूत्रवातानां शूलाध्मानाश्मशर्कराः |
जङ्घोरुत्रिकपात्पृष्ठरोगशोषौ गुदे स्थिते ||१२||
रुक् पार्श्वोदरहृन्नाभेस्तृष्णोद्गारविसूचिकाः |
कासः कण्ठास्यशोषश्च श्वासश्चामाशयस्थिते ||१३||
(च. चि. अ. २८) |

मल-मूत्र-वात यांचा ग्रह, शूल, आध्मान, अश्मरी, शर्करा, जङ्घा - मांड्या, त्रिकसंधी-पाय-पाठ यांचा शोष गुदस्थित वातामुळे (होतो.) पार्श्व (बरगड्या)- उदर येथे रुजा, हृदय, नाभी येथे (रुजा) तृष्णा, उद्गार विसूचिका, कास, कंठशोष, मुखशोष आणि श्वास आमाशयास्थित (वातामुळे होतात.)

आ. द. - पक्वाशयकुपितमाह– ग्रहः अप्रवृत्तिः, पात् चरणम्, पृष्ठरोगाः स्तम्भादयः, रोगो रुजाविशेषः, तथा शोफश्च| आमाशयकुपितमाह– रुगित्यादि| सुगमम्|| १२-१३||

पक्वाशयातील कुपित वाताबद्दल सांगतात - ग्रह (म्हणजे) अप्रवृत्ती. पात् म्हणजे पाय. स्तंभ आदि पृष्ठरोग. तसेच शोफ (म्हणजे सूज.) आमाशयातील कुपित वात सांगतात - रुजा इत्यादी.

मधुकोश - गुदस्थितवातलक्षणमाह– ग्रह इत्यादि| अश्मा अश्मरी| रोगो रुजा| गुद इत्युत्तरगुदे पक्वाशय इत्यर्थः, नतु गुदमात्रे; तथा सति अश्मरीकर्तृत्वानुपपत्तेः|| १२-१३||

गुदस्थित वातलक्षणं सांगतात - ग्रह इत्यादी. अश्मा म्हणजे अश्मरी. रोग म्हणजे रुजा. गुद म्हणजे उत्तरगुद म्हणजेच पक्वाशय. केवळ गुदमात्रात नव्हे (कारण) तसे (म्हटले असता) अश्मरी उत्पन्न होणे, याची उपपत्ती (संभवत) नाही.



# पक्वाशयस्थवातलक्षणं श्रोत्रादिगतवातलक्षणं च

पक्वाशयस्थवात लक्षण व श्रोत्रादिगतवात लक्षण (सांगतात.)

पक्वाशयस्थोऽन्त्रकूजं शूलाटोपौ करोति च |
कृच्छ्रमूत्रपुरीषत्वमानाहं त्रिकवेदनाम् ||१४||
श्रोत्रादिष्विन्द्रियवधं कुर्याद्दुष्टसमीरणः |
(सु. नि. अ. १) |

पक्वाशयस्थ (कुपित वात) अन्त्रकूजन, शूल, आटोप, मूत्रकृच्छ्र, पुरीष कृच्छ्रता, आनाह (हे व्याधी) उत्पन्न) करतो. श्रोत्रादींमध्ये (कुपित झालेला), दुष्ट वात इन्द्रियवध करतो.

आ. द. - सुश्रुतोक्तं पक्वाशयगतवातलक्षणमाह– पक्वेत्यादि| अन्त्रकूजं अन्त्रेऽव्यक्तशब्दं करोति| आटोपो रुजापूर्वकक्षोभः| त्रिकस्फिजोरुपरि सन्धिः| श्रोत्रादिगतलक्षणमाह– श्रोत्रादिषु गते श्रोत्रत्वक्चक्षुर्घ्राणरसनेन्द्रियाणां विनाशः स्वस्वविषयग्रहणेऽशक्तता||१४||–

सुश्रुतोक्त पक्वाशयस्थ वात लक्षण सांगतात ‘पक्वाशयस्थ इति।’. अन्त्रकूज (म्हणजे) अंत्रामध्ये अव्यक्तशब्द (उत्पन्न) करतो. आटोप (म्हणजे) रुजापूर्वक क्षोभ. त्रिक म्हणजे ‘स्फिक’च्या वरील संधी. श्रोत्रादिगत लक्षण सांगतात - श्रोत्रादि इत्यादी. श्रोत्रादी’मध्ये गत वात झाला असता श्रोत्र-त्वक्-चक्षु-घ्राण-रसना या इन्द्रियांचा विनाश होतो. स्वतःचा विषय ग्रहण करण्यामध्ये असमर्थता प्राप्त होते.

मधुकोश - पक्वाशयस्थवातलक्षणमाह– पक्वाशयस्थ इत्यादि| ननु, पक्वाशयस्थ इति पुनरुक्तिः, गुदे स्थित इत्यनेनैवोक्तत्वात्| उच्यते – गुदे स्थित इति दृढबलस्य लक्षणं, पक्वाशयस्थ इति सुश्रुतस्य; उभयलिङ्गोपन्यासस्तु सकललिङ्गप्रदर्शनार्थमित्यविरोधः||१४||

पक्काशयस्थ वात लक्षण सांगतात पक्काशयस्थ इति। खरोखर पक्काशयस्थ ही पुनरुक्ती होते; गुदे स्थित असे (एकदा) म्हटल्यानंतर. (त्याचे उत्तर) सांगतो. गुदे स्थित हे दृढबलाचे लक्षण आहे. पक्काशयस्थ हे सुश्रुताचे लक्षण आहे. दोन्ही लक्षणे सांगणे हे सर्व लक्षणं निर्माण करत असल्यामुळे त्यामध्ये विरोध येत नाही.



# त्वग्गतवातलक्षणम्

त्वग्गतवात लक्षण (सांगतात.)

त्वग्रूक्षा स्फुटिता सुप्ता कृशा कृष्णा च तुद्यते |
आतन्यते सरागा च पर्वरुक् त्वग्गतेऽनिले ||१५||
(च. चि. अ. २८) |


त्वग्गत वातामध्ये त्वचा रूक्ष (होणे), स्फुटित होणे, सुप्ती, कृश होते. वर्ण काळा होतो आणि टोचणी लागते. पर्व ओढली जातात आणि वर्ण बदलण्यासह पर्वांमध्ये रुजा उत्पन्न होते.

आ. द. - साम्प्रतं धातुकुपितस्य लक्षणम्| तत्र रसकुपितमाह– त्वगित्यादि| त्वक् त्वचा, रौक्ष्यादियुक्ता तुद्यते; आतन्यते विस्तार्यते इव| त्वक्शब्देनात्र रसोऽभिप्रेतः, तदाधारत्वात्| पर्वरुक् सर्वत्वग्व्यथा||१५||

आता धातुकुपित (वाताची) लक्षणे (सांगतो.) त्यापैकी रसकुपित (बद्दल) सांगतो. त्वक् इत्यादी. त्वक् म्हणजे त्वचा - रूक्षादी युक्त लक्षणांसह टोचते. त्वक् शब्दाने येथे रस अभिप्रेत आहे, (कारण तो) त्वचेचा आधार असल्यामुळे. पर्वरुक् म्हणजे सर्व त्वचेमध्ये व्यथा.

मधुकोश - त्वग्गतवातलक्षणमाह– त्वगित्यादि| आतन्यते विस्तार्यत एव| त्वग्गते इति उपधातुरूपां त्वचं प्राप्ते; चन्द्रिकाकारस्तु त्वक्शब्देन रसमाह, तेन रसगत इत्यर्थः| हृदयस्थस्य च रसस्यामाशयसामीप्यादामाशयगतवातलक्षणेनैव तदधिगतेः रसगतस्यानभिधानमिति कार्तिकः||१५||

त्वग्गत वातलक्षणं सांगतात - त्वक् इत्यादी. आतन्यते म्हणजे विस्तारित होते. त्वग्गत म्हणजे उपधातुरूप त्वचेसंबंधी (असे वाटल्यास); चंद्रिकाकार त्वक् शब्दाने रस सांगतात. त्यामळे रसगत असा अर्थ करावा. हृदयस्थ रस आमाशयाच्या समीप असल्यामुळे आमशयगत वातलक्षणांनीच त्याच्या अंतर्गत रसगत चे वर्णन केलेले नाही असे कार्तिकाचे मत आहे.



## असृग्गतवातलक्षणम्

रक्तगत वाताची लक्षणे (सांगतात.)

रुजस्तीव्राः ससन्तापा वैवर्ण्यं कृशताऽरुचिः |
गात्रे चारूंषि भुक्तस्य स्तम्भश्चासृग्गतेऽनिले ||१६||
(च. चि. अ. २८) |

संताप लक्षणासहित - तीव्र रुजा, वैवर्ण्य, कृशता, अरूंषि आणि (भोजन केलेल्या) अन्नाचा स्तंभ (ही लक्षणे) रक्तगत वातात होतात.

आ.द. - रक्तकुपितमाह– रुज इत्यादि| वैवर्ण्यं विच्छायता, गात्रे शरीरे|||१६||

रक्तकुपित वाताची (लक्षणे) सांगतात रुजा इत्यादी. वैवर्ण्य म्हणजे छायेमध्ये विगुणता. गात्रे म्हणजे शरीरामध्ये.

मधुकोश - असृग्गतवातलक्षणमाह – रुजा इत्यादि| अरूंषि व्रणाः| भुक्तस्य स्तम्भः भुक्तवतो गात्रस्तम्भः, सन्तर्पणेन रक्तस्य वृद्धेः| अन्ये त्वसृग्गतवातलक्षणं न पठन्ति, वातरक्तेन सहाभेदात्; तन्न, अत्र दुष्टो वायुः रक्तेनावृतः कुप्यति, वातरक्ते तु स्वकारणादुभावपि हस्त्यादिगमनकुपितौ विशिष्टसम्प्राप्त्या हस्तपादगतावेव वातरक्ताख्यं विकारं जनयत इति||१६||

असृग्गत (रक्तगत) वातलक्षणे सांगतात - रूजा इ. अरूंषि म्हणजे व्रण. ‘भुक्तस्य स्तम्भ’ म्हणजे जेवण केले असता गात्रांचा स्तम्भ (होणे), (त्याचे कारण) सन्तर्पणाने रक्ताची वृद्धी होत असल्यामुळे अन्य काही जण रक्तगत वात लक्षणे वाचत नाहीत. (त्यांचा अन्तर्भाव करीत नाहीत कारण) त्याचा वातरक्ताशी अभेद आहे (दोन्ही एकच आहे.) तसे नाही. येथे दुष्ट/दूषित वायू रक्ताने आवृत्त झाल्यामुळे कुपित होतो. वातरक्तामुळे स्वतःच्या कारणांमुळे हत्ती इ. वर प्रवास इ, विशिष्ट सम्प्राप्तिमुळे हस्त-पादगत (एवढ्याच मर्यादेत) वातरक्त नावाचा विकार उत्पन्न करतो.



## मांसमेदोगतवातलक्षणं मज्जास्थिगतवातलक्षणं चवातलक्षणम्

मांसमेदोगतवात लक्षण व मज्जास्थिगतवात लक्षण (सांगतात.)

गुर्वङ्गं तुद्यतेऽत्यर्थं दण्डमुष्टिहतं यथा |
सरुक् श्रमितमत्यर्थं मांसमेदोगतेऽनिले ||१७||
भेदोऽस्थिपर्वणां सन्धिशूलं मांसबलक्षयः |
अस्वप्नः सन्तता रुक् च मज्जास्थिकुपितेऽनिले ||१८||
(च. चि. अ. २८) |

अंग गुरु होते आणि दंड किंवा मुष्टि यांनी हनन (मार) झाल्याप्रमाणे अत्यंत टोचणी लागते. पीडायुक्त वेदना आणि आत्यंतिक (सहन न होणारी) दमणूक अशी लक्षणे मांसमेदोगत वातामध्ये दिसतात.
अस्थिपर्वांचा भेद, सन्धिशूल, मांस आणि बल यांचा क्षय, निद्राहानी आणि सतत रुजा ही लक्षणे मज्जास्थि कुपित वातामध्ये (दिसतात.)

आ.द. - मांसमेदोगतमाह– गुर्वित्यादि| अनिले मांसमेदोगते सति अङ्गं शरीरं, गुरु भारिकं, स्तब्धं निश्चलं, दण्डमुष्टिभ्यां हतमिव सरुक् पीडायुक्तं; श्रमितं श्रान्तं निःसहमित्यर्थः| मांसमेदोगतवातयोरेकलिङ्गत्वमदूरान्तरेण प्रत्यासत्तेराश्रयाभेदात्| एवं मज्जास्थिकुपिते वाच्यम्| सुश्रुते चात्र विशेष उक्तः– “कर्कशास्तोदबहुलान् ग्रन्थीन् मांसं समाश्रितः| वायुर्मेदोगतः कुर्याद्ग्रन्थीन् मन्दरुजोऽव्रणान्||” इति| तथा मज्जास्थिकुपितस्यापि वातस्य विशेष उक्तः– “अस्थिशोषं च भेदं च कुर्याच्छूलं च तत्स्थितः| तथा मज्जगते रुक् च न कदाचित्प्रशाम्यति|” इति| भेद इति| सुगमम्|| १७-१८||

वात मांस-मेदोगत झाला असता शरीर गुरु (म्हणजे) भारवान/ जड होते. स्तब्ध होते. दंड किंवा मुष्टि यांनी मारल्याप्रमाणे रुजायुक्त होते. सुश्रुतामध्ये याचा वेगळेपणा सांगितला आहे.

“कर्कशास्तोदबहुलान् ग्रन्थीन् मांसं समाश्रितः| वायुर्मेदोगतः कुर्याद्ग्रन्थीन् मन्दरुजोऽव्रणान्||”

त्याचप्रमाणे मज्जास्थिकुपित वाताचाही विशेष सांगितला आहे.

“अस्थिशोषं च भेदं च कुर्याच्छूलं च तत्स्थितः| तथा मज्जगते रुक् च न कदाचित्प्रशाम्यति|”

मधुकोश - मांसमेदोगतवातलक्षणमाह– गुर्वित्यादि| श्रमितं श्रान्तं निःसहमित्यर्थः| मांसमेदोगतवायोरेकलिङ्गत्वम् अदूरान्तरेण प्रत्यासत्तेराश्रयाभेदात्, एवं मज्जास्थिकुपितेऽपि वाच्यम्||१७-१८||

मांसमेदोगत वाताचे लक्षण सांगतात, गुरु इ. श्रमित म्हणजे दमलेला - असह्य या अर्थाने. मांसमेदोगत वायू (या पदाचे) एकलिंग असल्याने आणि ते निकट असल्याने त्यांची प्रत्यासत्ती असते (कारण) त्यांच्या आश्रयामध्ये अभेद आहे. (भेद नाही - दोन्हीचा आश्रय एकच आहे.) अशाच प्रकारे मज्जास्थिकुपित वाताचेही. (प्रत्यासत्ति - सान्निध्य)

# शुक्रस्थवातलक्षणम्

शुक्रस्थ वाताचे लक्षण (सांगतात.)

क्षिप्रं मुञ्चति बध्नाति शुक्रं गर्भमथापि वा |
विकृतिं जनयेच्चापि शुक्रस्थः कुपितोऽनिलः ||१९||
(च. चि. अ. २८) |

शुक्रस्थ कुपित वात, शुक्राचे शीघ्रपतन, शुक्रवहन (गोठवणे/भाठवणे/बाहेर पडू न देणे अशा अर्थाने.) आणि गर्भबध्न तसेच गर्भविकृती (उत्पन्न करतो.)


आ.द. - शुक्रगतमाह– क्षिप्रमित्यादि| अनिलः शुक्रस्थः कुपितः सन् शुक्रं क्षिप्रं शीघ्रं मुञ्चति बध्नाति च, तथा गर्भमपि क्षिप्रं मुञ्चति बध्नाति च| दुष्टशुक्रारब्धत्वाद्गर्भस्य; तथा विकृतिमिति गर्भस्य शुक्रस्य च जनयेत्||१९||

शुक्रस्थानी कुपित वात झाला असता शुक्राचे शीघ्रपतन करतो व बांधून ठेवतो. त्याचप्रमाणे गर्भाचेही शीघ्रपतन करतो व बांधून ठेवतो.

मधुकोश - शुक्रस्थवातलक्षणमाह– क्षिप्रमित्यादि| गर्भमिति दुष्टशुक्रारब्धत्वाद्गर्भस्य| विकृतिमिति गर्भस्य, शुक्रस्य च||१९||

शुक्रस्थ वातलक्षणं सांगतात - क्षिप्रं इत्यादी. गर्भ (म्हणण्याचे कारण) दुष्ट शुक्राने गर्भ संभवल्यामुळे. विकृती ही गर्भाची आणि शुक्राची.

# सिरागतवातलक्षणं स्नायुगतवातलक्षणं च



सिरागतवात लक्षण व स्नायुगतवात लक्षण (सांगतात.)

कुर्यात् सिरागतः शूलं सिराकुञ्चनपूरणम् |
(सु. नि. अ. १) |
स बाह्याभ्यन्तरायामं खल्लीं कौब्ज्यमथापि वा ||२०||
सर्वाङ्गैकाङ्गरोगांश्च कुर्यात् स्नायुगतोऽनिलः |
(च. चि. अ. २८) |

सिरागत वात शूल, सिरांचे आकुंचन किंवा पूरण, बाह्य आयाम, आभ्यन्तर आयाम, खल्ली, कुब्जता (ही लक्षणे/रोग) उत्पन्न करतो, स्नायुगत वात सर्वांग किंवा एकांग व्याधी (उत्पन्न) करतो.

आ.द. - कुर्यादिति| सिरागतो वायुः शूलं सिराकुञ्चनपूरणं च, तथा बाह्याभ्यन्तरमायामं, तथा खल्लीं वक्ष्यमाणां, कौब्ज्यं च कुर्यात्| कुञ्चनं सङ्कोचः| पूरणं स्थूलत्वम्, यदुक्तमन्यत्र– "सुप्तास्तन्व्यो बृहत्यो वा सिरावाते सिरागते" इति| स्नायुगतोऽनिलः सर्वाङ्गरोगानेकाङ्गरोगांश्च कुर्यात्| सुश्रुतेनाप्युक्तम्– "स्नायुप्राप्तः स्तम्भकम्पौ शूलमाक्षेपणं तथा|" इति| वाग्भटेनोक्तम्– "तस्य स्नाय्वास्थितः कुर्याद्गृध्रस्यायामकुब्जताम्|" इति||२०||

सिरागत वायु शूल, सिरांचे आकुंचन आणि पूरण, तसेच बाह्य-आभ्यन्तर आयाम, तसेच खल्ली आणि कुब्जता करतो. कुञ्चन (म्हणजे) संकोच. पूरण (म्हणजे) स्थूलता, जे अन्यत्र म्हटले आहे - "सुप्तास्तन्व्यो बृहत्यो वा सिरावाते सिरागते"
सुश्रुतानेही म्हटले आहे - "स्नायुप्राप्तः स्तम्भकम्पौ शूलमाक्षेपणं तथा|"
वाग्भटाने म्हटले आहे - "तस्य स्नाय्वास्थितः कुर्याद्गृध्रस्यायामकुब्जताम्|"

मधुकोश - सिरागतवातलक्षणमाह– कुर्यादित्यादि| आकुञ्चनं सङ्कोचः| पूरणं स्थूलत्वं, यदुक्तमन्यत्र– 'सुप्तास्तन्व्यो बृहत्यो वा सिरा वाते सिरागते|' इति| खल्लीं वक्ष्यमाणाम्||२०||

सिरागत वाताचे लक्षण सांगतात - कुर्यादित्यादि। आकुंचन म्हणजे संकोच. पूरणं म्हणजे स्थूलत्व जे अन्यत्रही म्हटले आहे. खल्ली (हे पुढे) सांगणार आहे.

सन्धिगतवात लक्षण (सांगतात.)

हन्ति सन्धिगतः सन्धीन् शूलाटोपौ करोति च ||२१||
(सु. नि. अ. १७) |
सन्धिगत वात सन्धींचे हनन आणि शूल, आटोप (ही लक्षणे/ व्याधी) उत्पन्न करतो.

आ.द. - सन्धिगतो वायुः सन्धीन् हन्ति, तथा शूलशोफौ करोति, सन्धिष्विति शेषः| हन्ति सन्धीनिति सन्धिश्लेष्मस्तम्भादिकं करोति| एतेनाकुञ्चनप्रसारणयोरभाव उक्तः||२१||
 सन्धिगत वायू सन्धींचे हनन करतो, त्याचप्रमाणे शूल-शोफ (ही लक्षणे) उत्त्पन्न करतो - हे सन्धींच्या ठिकाणी. (आतंकदर्पणकाराला शुलाटोपौ ऐवजी 'शूलशोफौ करोति च' हा पाठ उपलब्ध झाला असावा.)
याने आकुंचन आणि प्रसारण यांचा अभाव सांगितला आहे.

मधुकोश - सन्धिगतवातलक्षणमाह– हन्तीत्यादि| हन्ति सन्धिगतः सन्धीनिति सन्धिविश्लेषं स्तम्भादिकं [१] वा करोति||२१||
सन्धिगत वाताचे लक्षण सांगतात - हन्ति इ. हन्ति सन्निधगतः येथे सन्धींचा विश्लेष स्तम्भ इ. करतो (असा अर्थ.)



# पित्तकफावृतानां प्राणादीनां लक्षणानि

पित्तकफावृत प्राणादींची लक्षणे (सांगतात.)

(प्राणोदानौ समानश्च व्यानश्चापान एव च |
स्थानस्था मारुताः पञ्च यापयन्ति शरीरिणम्) |
(सु. नि. अ. १) |
प्राणे पित्तावृते छर्दिर्दाहश्चैवोपजायते |
दौर्बल्यं सदनं तन्द्रा वैरस्यं च कफावृते ||२२||
(सु. नि. अ. १) |
उदाने पित्तयुक्ते तु दाहो मूर्छा भ्रमः क्लमः |
अस्वेदहर्षौ मन्दोऽग्निः शीतता च कफावृते ||२३||
स्वेददाहौष्ण्यमूर्छाः स्युः समाने पित्तसंवृते |
कफेन सक्ते विण्मूत्रे गात्रहर्षश्च जायते ||२४||
अपाने पित्तयुक्ते तु दाहौष्ण्यं रक्तमूत्रता |
अधःकाये गुरुत्वं च शीतता च कफावृते ||२५||
व्याने पित्तावृते दाहो गात्रविक्षेपणं क्लमः |
स्तम्भनो दण्डकश्चापि शूलशोथौ कफावृते ||२६||
(सु. नि. अ. १) |२७|

(प्राण, उदान आणि समान, व्यान आणि अपान (असे आपापल्या) स्थानानुसार पाच (प्रकारचे) वायु शरीरी (देहासह आत्मा)चे यापन करतात.)
प्राण (वायु) पित्तावृत्त असता छर्दी आणि दाह उत्पन्न होतो. (प्राण वायु) कफावृत्त असता दुर्बलता, अवसाद, तन्द्रा आणि मुखवैरस्य (उत्पन्न होते.)
उदान (वायु) पित्तयुक्त असता दाह, मूर्च्छा, भ्रम आणि थकवा (येतो); घाम न येणे व हर्ष न होणे, अग्निमंदता आणि शीतता (उत्पन्न होते.)
समान वायु पित्तावृत्त असता स्वेद, दाह, उष्णता, मूर्च्छा; कफाने युक्त मल-मूत्र असता शरीर-हर्ष उत्पन्न होतो.

अपान वायु पित्तयुक्त असता दाह उष्णता, रक्तमूत्रता; कफावृत्त असता अधो शरीरात गुरुत्व आणि शीतता (उत्पन्न होते.)
व्यान वायु पित्तावृत्त असता दाह, शरीर-विक्षेप, थकवा; कफावृत्त असता स्तंभन, दंडक (नावाचा व्याधी), शूल, शोथ (उत्पन्न होतात.)

आ. द. - [अत्र पञ्चविधस्य वायोर्नामान्याह– प्राणेत्यादि| स्थानस्थाः इति स्थानशब्देनात्र साम्यमुच्यते| प्रापयन्ति धारयन्ति|] पित्तकफावृतानां प्राणादीनामर्धर्धश्लोकेन लिङ्गान्याह– प्राण इत्यादि| सदनमङ्गग्लानिः| दण्डवत् स्तम्भः| परस्परं च प्राणादीनामावरणानि विंशतिर्भवन्ति| द्वाविंशतिविधं विद्यादावरणं च तत्||||२२-२६||

(इथे पाच प्रकारच्या वायूची नावे सांगतात - प्राण इत्यादी. स्थानस्थाः अशा प्रकारे. स्थान शब्दाने येथे साम्य सांगितले आहे. प्रापयन्ति म्हणजे धारण करतात.)
पित्तकफावृत्त प्राण इत्यादींची अर्ध्या अर्ध्या श्लोकाने लक्षणे सांगतात - प्राण इत्यादी. सदन म्हणजे अंगग्लानी. दंडाप्रमाणे स्तंभ.
वाग्भटाने बावीस प्रकारचे वायूचे आवरण लिहिले आहे.
येथे दिशादर्शक सांगितले आहे. वैद्याने यानुसार सर्व प्रकारचे आवरण विभाजित करावे.

मधुकोश- पित्तकफावृतानां प्राणादीनामर्धार्धश्लोकेन लिङ्गान्याह– प्राण इत्यादि| गात्रहर्षो रोमाञ्चः| दण्डको दण्डवत् स्तम्भः| परस्परं च प्राणादीनामावरणानि विंशतिर्भवन्ति| यदुक्तं चरके– "मारुतानां हि पञ्चानामन्योन्यावरणं शृणु|" (च. चि. अ. २८) इत्यादि| एषां च लक्षणं चरक एव द्रष्टव्यम् विदेहे चैक एव वायुः स्थानकर्मभेदात् पञ्चेत्याहुः, संसर्गिद्रव्यत्वेनैकाश्रये जलवत्पृथगवस्थानानुपपत्तेः| ईशानाऽप्याह– "यथैको देवदत्तः स्थानभेदाद् गृहस्थो वानप्रस्थः, कर्मभेदात् कुम्भकारो मालाकार इत्युच्यते तथा वायुरपि" इति||२२-२६||

पित्तकफावृत्त प्राण इत्यादींची अर्ध्या अर्ध्या श्लोकाने लक्षणे सांगतात - प्राण इत्यादी. गात्रहर्ष (म्हणजे) रोमांच. दंडक (म्हणजे) दंडाप्रमाणे स्तंभ. आणि प्राणादींची परस्परांसमवेत आवरणे वीस होतात. जसे चरकामध्ये म्हटले आहे - “मारुतानां हि पञ्चानामन्योन्यावरणं शृणु|” इत्यादी. यांचे लक्षण चरकामध्येच पहावे आणि विदेहामध्ये एकाच वायु स्थान - कर्मभेदाने पाच (प्रकारचा) असे सांगितले आहे, संसर्गिक द्रव्यत्वामुळे एक आश्रय आणि जलाप्रमाणे वेगवेगळे (अवस्थान) आधार व उपपत्ती (कारण/संबंध) (यामुळे.) ईशाननेही म्हटले आहे - “यथैको देवदत्तः स्थानभेदाद् गृहस्थो वानप्रस्थः, कर्मभेदात् कुम्भकारो मालाकार इत्युच्यते तथा वायुरपि”.



आक्षेपकाची सामान्य लक्षणे (सांगतात.)

यदा तु धमनीः सर्वाः कुपितोऽभ्येति मारुतः |
तदाऽऽक्षिपत्याशु मुहुर्मुहुर्देहं मुहुश्चरः ||२७||
मुहुर्मुहुश्चाक्षेपणादाक्षेपक इति स्मृतः |
(सु. नि. अ. १) |

जेव्हा सर्व धमनीमधून कुपित वात संचार करतो, तेव्हा तो तत्काल देहाला (हातपायांना) शरीरापासून दूर फेकून देतो, पुन्हा पुन्हा (त्यामध्ये) चलन (वेडीवाकडी हालचाल) (असे याचे रूप असल्यामुळे) आक्षेपक असे ओळखतात (म्हणतात.)

आ. द.- मुहुर्मुहुर्देहमाक्षिपति, हस्त्यारूढस्येव गात्रं चालयति| मुहुश्चर इति हेतुगर्भविशेषणं, वारंवारं सञ्चरणशीलः, 'बहिश्चरः' इति पाठान्तरं तत्र कोष्ठाद्बहिः शाखागतश्चरन् आक्षेपं करोतीत्यर्थः| आक्षेपणात् चालनात्||२७||

मुहुर्मुहुर्देहमाक्षिपति म्हणजे हत्तीवर बसल्याप्रमाणे गात्रे (त्याचे हातपाय) हलतात, मुहुश्चर हे हेतुगर्भ विशेषण आहे, याचा अर्थ पुन्हा पुन्हा संचरणाचा स्वभाव असणे, आक्षेपणात् (म्हणजे) हालचालीमुळे (आक्षेपक म्हणतात.)
(हेतुगर्भ विशेषण म्हणजे विशिष्ट हेतूने वापरलेले विशेषण.)

मधुकोश - आक्षेपकस्य सामान्यलक्षणमाह– यदा त्वित्यादि| सर्वा इति ऊर्ध्वाधस्तिर्यग्गाः| आक्षिपति देहं हस्त्यारूढपुरुषस्येव गात्रं चालयति| मुहुश्चर इति हेतुगर्भविशेषणम्| 'बहिश्चर' इति पाठान्तरे कोष्ठाद्बहिः शाखागतश्चरन्नाक्षेपकं करोतीत्यर्थः| चन्द्रिकाकारस्तु एतन्नानुमन्यते, स्थानगाम्भीर्यादाक्षेपकस्य तदारम्भकवायोर्बहिश्चरत्वायुक्तत्वात्||२७||

आक्षेपकाचे सामान्य लक्षण सांगतो. यदा तु इत्यादी. सर्वा म्हणजे ऊर्ध्व, अधो, तिर्यक (धमनी). आक्षिपति देहं म्हणजे हत्तीवर बसलेल्या पुरुषाप्रमाणे गात्रांच्या हालचाली करतो. मुहुश्चर हे हेतुगर्भ विशेषण आहे. बहिश्चर असा पाठ (स्वीकारला) तर कोष्ठापासून बाहेर शाखागत होऊन आक्षेपक करतो असा अर्थ (होतो.) चन्द्रिकाकारांना हे मान्य नाही. (कारण) आक्षेपकाचे स्थानगांभीर्य (लक्षात घेता) त्याचा आरंभक वायू बहिश्चर होतो हे (म्हणणे) उचित नाही.



# अपतन्त्रकलक्षणम्
# अपतानकलक्षणं च

अपतन्त्रक लक्षण व अपतानक लक्षण (सांगतात.)

क्रुद्धः स्वैः कोपनैर्वायुः स्थानादूर्ध्वं प्रवर्तते ||२८||
पीडयन् हृदयं गत्वा शिरःशङ्खौ च पीडयन् |
धनुर्वन्नमयेद्गात्राण्याक्षिपेन्मोहयेत्तदा ||२९||
स कृच्छ्रादुच्छ्वसेच्चापि स्तब्धाक्षोऽथ निमीलकः |
कपोत इव कूजेच्च निःसञ्ज्ञः सोऽपतन्त्रकः ||३०||
दृष्टिं संस्तभ्य सञ्ज्ञां च हत्वा कण्ठेन कूजति |
हृदि मुक्ते नरः स्वास्थ्यं याति मोहं वृते पुनः ||३१||
वायुना दारुणं प्राहुरेके तदपतानकम् |
(च. सि. अ. १) |

(स्वतःच्या कारणांनी) कुपित वायु (आपल्या) स्थानापासून पूर्व प्रवृत्त होतो. (ऊर्ध्वभागाला) पीडन करून हृदयामध्ये जाऊन शिर व शंख यांना पीडा करून गात्रे (हातपाय) धनुष्याप्रमाणे वाकवतो - फेकून देतो आणि मोह उत्पन्न करतो, असा (रोगी) कष्टाने श्वास घेतो- नेत्र स्तब्ध होतात किंवा नेत्रांचे निमिलन होते, कबूतराच्या (कूजनाप्रमाणे) कूजन करतो. संज्ञाहीन होतो, याला अपतंत्रक म्हणतात.

दारुण कुपित असा वायू, हृदयात (जाऊन) दृष्टीचा स्तम्भ करून (स्थिर करून) संज्ञाहनन करून कंठातून कूजन करतो, मोह (वेग) मुक्त झाला असता पुन्हा स्वाथ्य प्राप्त करतो त्याला अपतानक असे म्हणतात.

आ. द. - स्थानात् पक्वाशयात्| ऊर्ध्वं शिरसि उद्दिश्य| पीडयन् रुजा| हृदयं ततः तस्मात् शिरः शङ्खौ च पीडयेत्| आक्षिपेत् चालयेत्| मोहयेदिन्द्रियाणि| कष्टेनोच्छ्वासं मुञ्चति| निमीलको निमीलिताक्षः, स्तब्धाक्षो वा भवतीत्यर्थः| कपोत इव कूजेत्, निःसञ्ज्ञः सञ्ज्ञारहितः, सोऽपतन्त्रकः, दृष्टिं रूपग्रहणयोग्यां, संस्तभ्याच्छाद्य, सञ्ज्ञां ज्ञानविषयिणीं बुद्धिं, विनाश्य| वायुना मुक्ते हृदि सुखं लभते| वृते मूर्छिते तमेवापतन्त्रमेके त्वपतानकमाहुः| तन्त्रान्तरे अपतन्त्रकलक्षणं पठितम्| तद्यथा– “क्रुद्धः स्वैः कोपनैर्वायुरपानो नाभिसंश्रयः| सन्दूष्य हृदयस्थं च मनो व्याकुलयेत्ततः|| पीडयन् हृदयं प्राप्य शिरःशङ्खौ च पीडयेत्| आक्षिप्य चाखिलं देहं मोहयेच्च पुनः पुनः|| स कृच्छ्रादुच्छ्वसेच्चापि स्वेदशैत्ययुतो बहिः| स निद्रां लभते नीतः प्राप्य चाशु प्रबुध्यते|| त्रसते कम्पते भूयो निःसञ्ज्ञः सोऽपतन्त्रकः| प्रलापो वक्त्रकटुता भ्रमो मूर्छाऽरुचिस्तृषा|| तस्मिन्पित्तान्विते स्वेदः पीताभः शीतकामिता| शिरोऽङ्गगौरवं ग्लानिः शीतद्विट् मन्दवेदनः| कफान्विते च सदनं शैत्यं च हृदयग्रहः|| वातोल्बणेऽङ्गस्फुरणं शिरोमन्याकटिव्यथा| धैर्यादिविप्लवो दैन्यं विषयेष्वनवस्थितः||”||२८-३१||

स्थानात् म्हणजे पक्वाशयात्. ऊर्ध्व म्हणजे शिराला उद्देशून. पीडयन् म्हणजे रुजा उत्पन्न करून. हृदय व शंख यांना पीडा उत्पन्न करतो. आक्षिपेत् म्हणजे हालचाल करतो. (झटकतो.) इन्द्रियांचा मोह करतो. कष्टाने निःश्वास सोडतो. डोळे स्तब्ध किंवा निमिलित करतो. कबूतराप्रमाणे कूजन करतो. निःसंज्ञ म्हणजे संज्ञारहित होतो, तो अपतानक.

रूपग्रहण योग्य अशी दृष्टी, संस्तभ्य म्हणजे आच्छादन करून. संज्ञा म्हणजे ज्ञानविषयक बुद्धी (तिचा) नाश करून. वायूपासून मुक्त झाल्यामुळे (कुपित वायूचे शमन झाल्यामुळे) हृदयोमध्ये मोकळे वाटते. वृते म्हणजे मूर्च्छित झाले असता. त्यालाच अपतंत्र, काही अपतानक म्हणतात. अन्य तन्त्रामध्ये अपतंत्रकाचे लक्षण (पुढीलप्रमाणे) सांगितले आहे.

“क्रुद्धः स्वैः कोपनैर्वायुरपानो नाभिसंश्रयः| सन्दूष्य हृदयस्थं च मनो व्याकुलयेत्ततः|| पीडयन् हृदयं प्राप्य शिरःशङ्खौ च पीडयेत्| आक्षिप्य चाखिलं देहं मोहयेच्च पुनः पुनः|| स कृच्छ्रादुच्छ्वसेच्चापि स्वेदशैत्ययुतो बहिः| स निद्रां लभते नीतः प्राप्य चाशु प्रबुध्यते|| त्रसते कम्पते भूयो निःसञ्ज्ञः सोऽपतन्त्रकः| प्रलापो वक्त्रकटुता भ्रमो मूर्छाऽरुचिस्तृषा|| तस्मिन्पित्तान्विते स्वेदः पीताभः शीतकामिता| शिरोऽङ्गगौरवं ग्लानिः शीतद्विट् मन्दवेदनः| कफान्विते च सदनं शैत्यं च हृदयग्रहः|| वातोल्बणेऽङ्गस्फुरणं शिरोमन्याकटिव्यथा| धैर्यादिविप्लवो दैन्यं विषयेष्वनवस्थितः||”

(स्वतःच्या कारणांनी) कुपित नाभीस्थानी स्थित अपान वायु हृदयामध्ये जाऊन मनाला पीडा करतो. हृदयास पीडा देतो व शिर व शंख यांना पीडा देतो. संपूर्ण देहात आक्षेप करून पुन्हा पुन्हा मोह उत्पन्न करतो. तो (मनुष्य) कष्टाने उच्छवास करतो आणि घाम व शैत्य यांनी युक्त होतो. झोप लागते व सत्वर जाग येते. त्रस्त होतो, कंपित होतो व निःसंज्ञ होतो, तो अपतंत्रक होय. प्रलाप, मुखकटुता, भ्रम, मूर्च्छा, अरुची, तृष्णा, स्वेद, पीतावभासता, शीतकामिता (हे) तो पित्तान्वित असता, कफान्वित असता शिर व अङ्गगौरव, ग्लानि, शीतद्वेष, मन्दवेदना, सदन, शैत्य आणि हृदयग्रह; (तसेच) वातोल्बण असता अङ्गस्फुरण, शिर-मन्या-कटि वेदना, धैर्यादिविप्लव, दैन्य आणि विषयांमध्ये अनवस्थितत्व (दिसते.)

मधुकोश - अस्यैवावस्थाविशेषावपतन्त्रकापतानकावाह– क्रुद्ध इत्यारभ्य एके तदपतानकमित्यन्तेन| स्वैः कोपनैरित्यनेन रूक्षादिकुपितः स्वतन्त्रो न त्वावरणकुपित इतीशानः| निमीलिताक्षः स्तब्धाक्षो वा भवतीत्यर्थः| आक्षेपकश्चतुर्विधो भवति– दण्डापतानकोऽभ्यन्तरायामो बहिरायामोऽभिघातजश्चेति| दृढबलेन यद्यपि आक्षेपकात् पूर्वमन्तरायामबहिरायामौ पठितौ, तथाऽप्याक्षेपकविशेषावेतौ मन्तव्यौ, सुश्रुतदर्शनात्||२८-३१||

याचेच (आक्षेपकाचे) अवस्थाविशेष अपतंत्रक आणि अपतानक सांगतो. क्रुद्ध इथपासून एके इथपर्यंत श्लोकाने स्वतःच्या (कारणांनी) कुपित याने रूक्षादि (गुणांनी) कुपित (असा अर्थ) आवरण कुपित नव्हे असे ईशानाचे मत आहे. डोळे स्तब्ध होतात किंवा निमिलित होतात असा अर्थ. आक्षेपक चार प्रकारचा असतो. दंडापतानक, आभ्यन्तरायाम, बहिरायाम आणि अभिघातज. दृढबलाने जरी आक्षेपकापूर्वी अन्तरायाम, वाचले (लिहिले) असले तरी सुश्रुताच्या दर्शनानुसार (ग्रन्थानुसार) ते आक्षेपकाचे प्रकार जाणावेत.



# दण्डापतानकलक्षणम्

दण्डापतानकाचे लक्षण (सांगतात.)

कफान्वितो भृशं वायुस्तास्वेव यदि तिष्ठति ||३२||
दण्डवत् स्तम्भयेद्देहं स तु दण्डापतानकः |
(सु. नि. अ. १) |

भरपूर कफाने अन्वित (वायू) त्या (धमनीमध्येच थांबला, अडकला तर तो) शरीर दंडाप्रमाणे थांबवतो (जखडतो) त्याला दंडापनानक (असे म्हणतात).

आ.द. - तास्विति सर्वधमनीषु||३२||
तासु म्हणजे सर्व धमनीमध्ये.

मधुकोश - एषां लक्षणमाह– कफान्वित इत्यादि| भृशं कफान्वित इत्यनेन पित्तमपि न वार्यत इत्याहुः| चरके त्वस्यासाध्यत्वं केवलवातजत्वेन द्रष्टव्यम्| यदाह– “पाणिपादशिरःपृष्ठश्रोणीः स्तभ्नाति मारुतः| दण्डवत् स्तब्धगात्रस्य दण्डकः सोऽनुपक्रमः||” (च. चि. अ. २८) इति| तास्विति सर्वधमनीषु||३२||

याचे (दंडापतानक) लक्षण सांगतो -कफान्चित इ.. भृश कफान्वित असे सांगून पित्तालाही सोडत नाही असे सांगतात. चरकामध्येचे असाध्यत्व केवळ वातज असेल तरच दिसते, जे म्हटले आहे - “पाणिपादशिरःपृष्ठश्रोणीः स्तभ्नाति मारुतः| दण्डवत् स्तब्धगात्रस्य दण्डकः सोऽनुपक्रमः||” तासु म्हणजे सर्व धमनींमध्ये.

धनुःस्तम्भलक्षण (सांगतात.)

धनुस्तुल्यं नमेद्यस्तु स धनुःस्तम्भसञ्ज्ञकः ||३३||
(सु. नि. अ. १) |
धनुष्याप्रमाणे (रोगी) वागतो. (त्या रोगाला) धनुस्तम्भ नाव (आहे.)

आ.द. - अन्तरायामबहिरायामयोः साधारणरूपमाह– स्तम्भः सामान्यः, धनुःस्तम्भः अस्यैव भेदः| धनुस्तुल्यमिति धनुस्तुल्यं क्रोडेन नम्रस्तिष्ठति, दण्डापतानकस्तु शुष्ककाष्ठदण्डवत्||३३||
अंतरायाम व बहिरायामाचे साधारण रूप सांगतो - स्तम्भ हा सामान्य, धनुस्तम्भ हा त्याचाच भेद, धनुस्तुल्य म्हणजे छातीत वाकून राहतो, दंडापतानक म्हणजे वाळलेल्या लाकडाच्या काठीप्रमाणे (राहतो.)

मधुकोश - अन्तरायामबहिरायामयोः साधारणं रूपमाह– 'धनुस्तुल्यं नमेद्यस्तु स धनुस्तम्भसञ्ज्ञकः' इति||३३||
अंतरायाम व बहिरायामाचे साधारण रूप सांगतो - धनुस्तुल्य इ.



# अभ्यन्तरायामलक्षणं बाह्यायामलक्षणं च

अभ्यन्तरायाम लक्षण व बाह्यायाम लक्षण (सांगतात.)

अङ्गुलीगुल्फजठरहृद्वक्षोगलसंश्रितः |
स्नायुप्रतानमनिलो यदाऽऽक्षिपति वेगवान् ||३४||
विष्टब्धाक्षः स्तब्धहनुर्भग्नपार्श्वः कफं वमन् |
अभ्यन्तरं धनुरिव यदा नमति मानवम् ||३५||
तदाऽस्याभ्यन्तरायामं कुरुते मारुतो बली |
बाह्यस्नायुप्रतानस्थो बाह्यायामं करोति च ||३६||
तमसाध्यं बुधाः प्राहुर्वक्षःकट्यूरुभञ्जनम् |
(सु. नि. अ. १) |

अंगुली, गुल्फ, जठर, हृदय, वक्ष, गळा यातील स्नायु प्रतानांना जेव्हा वेगवान वायु फेकतो (झटकतो, त्यामुळे) नेत्र स्तब्ध करून हनुवटीचा भग्न करून, बरगड्यांचा भग्न करून कफाचे वमन करून जेव्हा माणूस आतल्या बाजूला धनुष्याप्रमाणे वाकतो (तेव्हा त्याला) आभ्यन्तरायाम म्हणतात. बलवान वायू बाह्य स्नायु व प्रतान येथे स्थित होऊन बाह्य आयाम करतो, वक्ष, कटी व ऊरु (मांड्या) यांचा भंग होत असल्यामुळे याला असाध्य म्हणतात.

आ.द. - विशेषलक्षणमाह– अङ्गुलीत्यादि| बली वायुः कुपितः गुल्फौ चरणघुटिके, वक्षो बाहुद्वयान्तरं, हृदयं तदभ्यन्तरं द्व्यङ्गुलं, स्नायुप्रतानं लतावदनेकप्ररोहं स्नायुजालं, स्नाय्वित्युपलक्षणं, तेन सिराकण्डरयोरपि ग्रहणम्| यदुक्तं तन्त्रान्तरे– “महाहेतुर्बली वायुः सिराः सस्नायुकण्डराः| मन्यापृष्ठाश्रिता बाह्याः संशोष्यायामयेद्बहिः” इत्यादि| ततः स्नायुप्रतानं धनुरिव नामयेत्| अभ्यन्तरायामं क्रोडे नतम्| हनुः कण्ठकपोलसन्धिः| बहिरायामलक्षणमाह– बाह्येत्यादि| पूर्ववद्बाह्यस्नायुप्रतानं धनुर्वदानमेत्| बाह्यायामं पृष्ठे नतं वक्षःकठ्यूरुभङ्ग्त्वात्| तमसाध्यमाहुः||३४-३६||

बली म्हणजे कुपित वायु. गुल्फौ म्हणजे पायाचे घोटे. आतील स्नायूप्रतान धनुष्याप्रमाणे वाकवतो. हनु म्हणजे कंठ (गळा) व गाल यांचा संधी. बहिरायामाचे लक्षण सांगतात इ. पूर्वीप्रमाण (अंतरायामाप्रमाणे) स्नायुप्रतानांना बाहेर वाकवतो. बाह्यायामात (रोगी), वक्ष, कटी, ऊरु यांचा भंग झाल्यामुळे पाठीत वाकतो. त्याला असाध्य म्हणतात.

मधुकोश - विशेषलक्षणमाह– अङ्गुलीत्यादि| वक्षो बाहुद्वयान्तरम्| हृदयं तदभ्यन्तरं द्व्यङ्गुलम्| स्नायुप्रतानं लतावदनेकप्ररोहं स्नायुजालम्; स्नायुरित्युपलक्षणं, तेन सिराकण्डरयोरपि ग्रहणम्| यदुक्तं तन्त्रान्तरे– "महाहेतुर्बली वायुः सिराः सस्नायुकण्डराः| मन्यापृष्ठाश्रिता बाह्याः संशोष्यायामयेद्बहिः||" इत्यादि| अभ्यन्तरायामं क्रोडे नतं, बाह्यायामं पृष्ठे नतम्| अन्तरायामबहिरायामाभ्यां तन्त्रान्तरोक्तकुब्जस्यावरोधः| यदुक्तम्– "हृदयं यदि वा पृष्ठमुन्नतं क्रमशः सरुक्| क्रुद्धो वायुर्यदा कुर्यात्तदा तं कुब्जमादिशेत्||" इति||३४-३६||

(मागच्या श्लोकात सामान्य लक्षण सांगितले) आता विशेष लक्षण सांगतो. अंगुली इ. वक्ष म्हणजे दोन बाहूंच्या मधील शरीराचा भाग. त्यामधील हृदय म्हणजे त्याच्या (आत असणारा) दोन अंगुल (अवयव.) स्नायुप्रतान म्हणजे वेलींच्या अनेक प्ररोहांप्रमाणे (असणारे) स्नायुजाल, स्नायू हे उपलक्षण (मानावे.) त्याने सिरा व कंडरा यांचाही समावेश होतो. जे अन्य तंत्रात म्हटले आहे.

"महाहेतुर्बली वायुः सिराः सस्नायुकण्डराः| मन्यापृष्ठाश्रिता बाह्याः संशोष्यायामयेद्बहिः||"

अन्तरायाम म्हणजे छातीत वाकलेला, बाह्य आयाम, म्हणजे पाठीत वाकलेला, अंतरायाम-बहिरायाम (सांगितल्यामुळे) अन्य तंत्रात सांगितलेल्या कुब्ज (व्याधीचा) निरास होतो, जे म्हटले आहे.

"हृदयं यदि वा पृष्ठमुन्नतं क्रमशः सरुक्| क्रुद्धो वायुर्यदा कुर्यात्तदा तं कुब्जमादिशेत्||"

अभिघातज आक्षेपक लक्षण (सांगतात.)

(हृदयं यदि वा पृष्ठमुन्नतं क्रमशः सरुक् |
क्रुद्धो वायुर्यदा कुर्यात् तदा तं कुब्जमादिशेत्) |
कफपित्तान्वितो वायुर्वायुरेव च केवलः ||३७||
कुर्यादाक्षेपकं त्वन्यं चतुर्थमभिघातजम् |
(सु. नि. अ. १) |

(कुपित वायू हृदय वा पृष्ठ क्रमशः उन्नत व रुजायुक्त करतो, तेव्हा त्यास कुब्ज म्हणतात.) केवल वायू किंवा कफपित्तान्वित वायू आणि चौथा आभिघात (हे हेतू) आक्षेपक करतात.

आ.द. - उक्तानामाक्षेपप्रकाराणां कफपित्तानुबन्धमाह– कफेत्यादि| कफपित्तानुबन्धश्चात्र शैत्यशोषगुरुत्वानीत्यादिनोक्तलक्षणे बोद्धव्यः, केवलः स्वतन्त्र आक्षेपं करोति| अन्यं चतुर्थमभिघातजम्| दण्डाभिघातकुपितवातजातस्य तु लक्षणम्| 'यदा तु धमनीः सर्वाः' इत्यादिना ज्ञेयम्||३७||

उक्त आक्षेपक प्रकारांचा कफपित्ताचा अनुबंध सांगतो. कफ इत्यादी. येथे पित्तकफाचा अनुबंध शैत्य, शोष, गुरुत्व इ उक्त लक्षणांनी समजून घ्यावा.

केवल म्हणजे स्वतंत्र. अन्य चौथा अभिघातज. काठी इ नी मारल्यामुळे कुपित झालेल्या वातामुळे भंग झलेला, त्याचे लक्षण यदा तु धमनी सर्वाः या सामान्य लक्षणातच पहावे.

मधुकोश - उक्तानामाक्षेपकप्रकाराणां कफपित्तानुबन्धमाह– कफपित्तान्वित इत्यादि| एतच्च दण्डापतानकलक्षणमेव जेज्जटेन व्याख्यातम्| पित्तकफानुबन्धश्चात्र शैत्यशोथगुरुत्वानीत्यादिनोक्तलक्षण एव बोध्यः| चतुर्थमभिघातजमिति दण्डापतानकादित्रितयापेक्ष्य चतुर्थत्वम्, अभिघातजं दण्डाद्यभिघातकुपितवातजम्; अस्य च लक्षणम्– "यदा तु धमनीः सर्वाः" इत्यादिनोक्तसामान्यलक्षणं द्रष्टव्यम्||३७||

उक्त आक्षेपक प्रकारांचा कफपित्ताचा अनुबंध सांगतो. कफपित्तान्वित इत्यादी. जेज्जटाने हेच दंडापतानकाचे लक्षण सांगितले आहे. येथे कफपित्ताचा अनुबंध शैत्य, शोथ, गुरुत्व इ उक्त लक्षणांनी समजून घ्यावा.

चौथा अभिघातज म्हणजे या तीन पेक्षा वेगळा, अभिघातज म्हणजे काठी इ नी मारल्यामुळे कुपित झालेल्या वातामुळे भंग झलेला, त्याचे लक्षण 'यदा तु धमनी सर्वाः' या सामान्य लक्षणातच पहावे.

अपतानकाचे असाध्य लक्षण (सांगतात.)

गर्भपातनिमित्तश्च शोणितातिस्रवाच्च यः ||३८||
अभिघातनिमित्तश्च न सिध्यत्यपतानकः |
(सु. नि. अ. १) |

गर्भपातामुळे झालेला, अतिरक्तस्रावामुळे झालेला आणि अभिघातामुळे झालेला अपतानक साध्य (ठरत) नाही.

आ.द. - असाध्यमाह– गर्भेत्यादि| अत्रापतानकमुपलक्षणं, तेन चतुष्टयमपि गृह्यते ||३८||

असाध्य लक्षण सांगतात - गर्भ इ. येथे अपतानक हे उपलक्षण आहे. त्याने चारही (प्रकारांचा) बोध होतो.

मधुकोश - असाध्यत्वमाह– गर्भपातेत्यादि| गदाधरस्त्वाह– कफपित्तान्वित इत्यादिना निमित्तभेदेनाक्षेपकश्चतुर्धा इति; तद्यथा– एकः कफान्वितेन वातेन, द्वितीयः पित्तान्वितेन, तृतीयः केवलेन, चतुर्थोऽभिघातेनेति| अत्र पक्षे गर्भपातशोणितातिस्रावजौ केवलवातेन ग्राह्यौ| एतेषां च मुहुर्मुहुराक्षेपणं बोध्यम् आक्षेपकविशेषत्वात्||३८||

असाध्यत्व सांगतात - गर्भपात इत्यादी. गदाधर म्हणतो- कफपित्तान्वित इत्यादींमुळे- हेतू भेदाने अक्षेपक चतुर्विध असतो. जसे एक कफान्चित वाताने, दुसरा पित्तान्वित वाताने, तिसरा केवल वाताने व चौथा अभिघाताने. या मतानुसार गर्भपातज आणि शोणित अतिरक्तस्रावज हे केवल वाताचे समजावेत. यामध्ये पुन्हा पुन्हा आक्षेपण होते (असे) जाणावे. (हा) त्या आक्षेपकाचा विशेष असल्यामुळे.



# पक्षवधस्य सम्प्राप्तिपूर्वकं लक्षणम्

पक्षवधाचे सम्प्राप्तिपूर्वक लक्षण (सांगतात.)

गृहीत्वाऽर्धं तनोर्वायुः सिराः स्नायूर्विशोष्य च ||३९||
पक्षमन्यतरं हन्ति सन्धिबन्धान् विमोक्षयन् |
कृत्स्नोऽर्धकायस्तस्य स्यादकर्मण्यो विचेतनः ||४०||
एकाङ्गरोगं तं केचिदन्ये पक्षवधं विदुः |
सर्वाङ्गरोगस्तद्वच्च सर्वकायाश्रितेऽनिले ||४१||
(वा. नि. अ. १५) |


(कुपित) वायू अर्थ शरीराला ग्रहण करून (पसरुन) सिरा आणि स्नायू यांचे विशोषण करून (दोन्ही पैकी) एका (बाहू आणि पार्श्व) भागाचे हनन करतो, सन्धिबंधांना मोकळे करतो. हा कुपित वायू सर्व शरीर व्यापी असून अर्थशरीरामध्ये क्रियाल्पता आणि अल्प चेतना उत्पन्न होते. त्याला एकांगरोग किंवा काही जण (पक्षवध म्हणून) ओळखतात. त्याचप्रमाणे सर्व शरीराच्या आश्रयाने (झालेल्या व्याधीला) सर्वांगरोग म्हणतात.

आ. द. - पक्षवधमाह– गृहीत्वेत्यादि| वायुस्तनोः शरीरस्यार्धं गृहीत्वा सिराः स्नायूर्विशोष्य शोषयित्वा अन्यतरं पक्षं हन्ति निरीहं करोति| अर्धमिति अर्धमर्यादया अर्धनारीश्वरवत्| पक्षमिति शरीरार्धं बाहुकक्षपार्श्वादिभागम्, अन्यतरमिति वामं दक्षिणं वेति| किं कुर्वन्? सन्धीनां बन्धान् सन्धिबन्धान् कफसहितस्नायुभिर्वृतान् विमोक्षयन्निति गदाधरः| अतः सिराः स्नायूर्विशोष्येत्युक्तम्| तस्य तथाविधस्य पुंसः कृत्स्नो निःशेष अर्धकायोऽकर्मण्यो विचेतनः स्यात्| अर्धकाय इत्युक्तेऽपि कृत्स्नग्रहणं युगपत्सर्वाङ्गव्याप्त्यर्थम्| अकर्मण्य ईषच्चेष्टाक्षयः| विचेतनोऽल्पचेतनः ईषत्स्पर्शादिज्ञानवानित्यर्थः| केचिदाचार्यास्तं व्याधिमेकाङ्गरोगं विदुः, अन्ये पक्षवधं विदुः| सर्वकायाश्रिते समस्तदेहगते वाते तद्वत्सर्वाङ्गरोगमित्याहुः| तद्वच्चेत्यनेन 'सिराः स्नायूर्विशोष्य च' इत्यादिसम्प्राप्तिं लक्षणं चातिदिशति||३९-४१||

वायू शरीराच्या अर्ध्या भागाचे ग्रहण करून, सिरा-स्नायू यांचे शोषण करून एका बाजूचे हनन करतात, म्हणजे ताबा कमी करतात. पक्ष म्हणजे शरीराचा अर्धाभाग. काय करून ? सन्धीचे बंध मोकळे करून असे गदाधर (म्हणतो.) त्याचे म्हणजे अशा प्रकारच्या रुग्णाचे कृत्स्न म्हणजे संपूर्ण अर्धशरीर अकर्मण्य म्हणजे चेतनारहित होते. काही आचार्य त्या व्याधीला एकांगरोग म्हणून ओळखतात तर काही जण पक्षवध म्हणून (ओळखतात.) त्याचप्रमाणे सर्व कायाश्रित (सर्व देहगत) वात असताना त्या (रोगाला) सर्वांग रोग असे म्हणतात.

मधुकोश - पक्षवधमाह– गृहीत्वेत्यादि| अर्धमिति अर्धमर्यादया अर्धनारीश्वरवत्| पक्षं बाहुकक्षपार्श्वादिभागम्, अन्यतरमिति वामं दक्षिणं वा| सन्धिबन्धान् कफसहितस्नायुभिर्वृतान् मोक्षयन्निति गदाधरः; अत एव "सिराः स्नायूर्विशोष्य" इत्युक्तम्| अर्धकाय इत्युक्तेऽपि कृत्स्नग्रहणं युगपत् सर्वार्धाङ्गव्याप्त्यर्थम्| अकर्मण्य ईषच्चेष्टाक्षमः| विचेतनोऽल्पचेतनः, ईषत्स्पर्शादिज्ञानवानित्यर्थः| तद्वच्चेत्यनेन सिराः स्नायूर्विशोष्य चेत्यादिसम्प्राप्तिं लक्षणं चातिदिशति||३९-४१||

पक्षवध सांगतात - गृहीत्वा इत्यादी. अर्ध म्हणजे अर्धी मर्यादा असलेलं - अर्धनारी-नटेश्वराप्रमाणे. पक्ष म्हणजे बाहू, कक्षा, पार्श्व इ भाग, अन्यतर म्हणजे डावा किंवा उजवा. कफासहित स्नायूंनी आवरण केलेल्या सन्धिबंधांचा मोक्ष करून (मोकळे करून पुढील लक्षणे उत्पन्न करतो.) असे गदाधर (म्हणतो.) म्हणूनच सिरा स्नायू विशोष्य असे म्हटले आहे. अर्ध कायी, असे सांगूनही कृत्स्न शब्द वापरण्यामध्ये एकाच वेळी संपूर्ण अर्धांग व्यापलेले असते असा अर्थ (करावा.) अकर्मण्य म्हणजे अल्प हालचाल करण्यास समर्थ. विचेतन म्हणजे अल्प चेतन, स्पर्शादी ज्ञान अल्प असणे असा अर्थ. (सर्वांग रोगाच्या बाबतीत) तद्वत असे सांगून सिरा स्नायू विशोष या सम्प्राप्तीचा आणि लक्षणांचा अतिदेश केला आहे.



# पक्षवधस्य साध्यासाध्यविचारः

पक्षवधाचा साध्यासाध्य विचार (सांगतात.)

दाहसन्तापमूर्छाः स्युर्वायौ पित्तसमन्विते |
शैत्यशोथगुरुत्वानि तस्मिन्नेव कफान्विते ||४२||
शुद्धवातहतं पक्षं कृच्छ्रसाध्यतमं विदुः |
साध्यमन्येन संयुक्तमसाध्यं क्षयहेतुकम् ||४३||
(सु. नि. अ. १) |
(गर्भिणीसूतिकाबालवृद्धक्षीणेष्वसृक्स्रुते |
पक्षाघातं परिहरेत् वेदनारहितो यदि) |

(कुपित) वातपित्त-समन्वित असेल तर दाह, संताप, मूर्च्छा (ही लक्षणे) होतात. तोच (वायू) कफान्वित असेल तर शैत्य, शोथ, गुरुत्व ही लक्षणे होतात. शुद्ध वाताने हनन केलेला पक्ष (एकांगरोग) कृच्छ्रसाध्यतम (म्हणून) ओळखतात. अन्याने ( कफाने किंवा पित्ताने) संयुक्त (व्याधी) साध्य, क्षयजनित (व्याधी) असाध्य (असतो.)

आ.द. - तस्यैव साध्यासाध्यत्वज्ञानार्थमाह– शुद्धेत्यादि| कृच्छ्रसाध्यं कष्टसाध्यं|| ४२-४३||

पक्षाघाताचे साध्यासाध्यत्व दाखविण्यासाठी सांगतात- शुध्द इ.. कृच्छ्रसाध्य म्हणजे कष्टसाध्य.

मधुकोश - तस्यैव साध्यासाध्यज्ञानार्थमाह– दाहेत्यादि| एतच्च लक्षणमन्यत्रापि वातरोगे द्रष्टव्यम्, अत एव सामान्येन वायाविति कृतवान्| शुद्धः केवलः| अन्येनेति कफेन, पित्तेन वा| क्षयहेतुकमिति धातुक्षयकुपितशुद्धवातजमिति||४२-४३||

त्याच्याच (एकांग रोगाच्या) साध्यासाध्य ज्ञानासाठी सांगतात - दाह इ.. हेच लक्षण अन्य वातरोगांमध्ये ही पहावे (समजून घ्यावे.) म्हणूनच सामान्यतया वायूने (अशी शब्दांची योजना) केली आहे. शुध्द म्हणजे केवळ. अन्याने म्हणजे कफाने किंवा पित्ताने. क्षयहेतुक म्हणजे धातुक्षयजन्य कुपित वातज असा अर्थ.



# अर्दितस्य निदानसम्प्राप्तिपूर्वकं लक्षणम्

अर्दिताचे निदान-सम्प्राप्तिपूर्वक लक्षण (सांगतात.)

उच्चैर्व्याहरतोऽत्यर्थं खादतः कठिनानि वा |
हसतो जृम्भतो वाऽपि भाराद्विषमशायिनः ||४४||
शिरोनासौष्ठचिबुकललाटेक्षणसन्धिगः |
अर्दयत्यनिलो वक्त्रमर्दितं जनयत्यतः |
वक्रीभवति वक्त्रार्धं [१] ग्रीवा चाप्यपवर्तते ||४५||
शिरश्चलति वाक्सङ्गो नेत्रादीनां च वैकृतम् |
ग्रीवाचिबुकदन्तानां तस्मिन् पार्श्वे च वेदना ||४६||
(यस्याग्रजो रोमहर्षो वेपथुर्नेत्रमाविलम् |
वायुरूर्ध्वं त्वचि स्वापस्तोदो मन्याहनुग्रहः) |
तमर्दितमिति प्राहुर्व्याधिं व्याधिविचक्षणाः |
(सु. नि. अ. १) |

मोठ्याने अत्यधिक बोलले समता, कठिण पदार्थ खाल्ले असता, हसण्याने, जांभया देण्याने, भारामुळे आणि विषम शयनामुळे, शिरोभाग, नासा, चिबुक (हनुवटी), कपाळ आणि नेत्रसंधी यातील (कुपित्त) वायू चेहरा वाकडा करतो आणि अर्दित (व्याधी) उत्पन्न करतो,

(चेहेऱ्याचा अर्धा भाग वाकडा होतो, जीभ वेडीवाकडी होते, शिरोमाग कंपित होतो, बोलणे अडखळते, नेत्र इ विकृत होतात, ग्रीवा, मान, हनुवटी, दात हेही विकृत होतात. (तसेच) त्यामध्ये बरगड्यांमध्येही वेदना होतात. ज्याच्या नंतर रोमहर्ष, वेपथु (कंप), डोळे गढूळ होणे आणि ऊर्ध्ववायूमुळे त्वचेमध्ये सुप्ती, तोद, मान व हनुवटी यांचा ग्रह होतो. त्या व्याधीला बलवान लोक अर्दित असे म्हणतात.

आ. द. - अर्दितस्य निदानपूर्वकं लक्षणमाह– उच्चैरित्यादि| उच्चैर्भाषणं, कठिनानि पूगफलादीनि खादतः, विषमाच्छयनात् ग्रीवादिवैपरीत्यशयनात्, अर्दयति पीडयति, ग्रीवां व्याप्य अपवर्तते वक्रीभवति, चलति कम्पते, वाक्सङ्गो वचनस्यानिर्गमः| आदिशब्देन गण्डनासादीनां ग्रहणं, वैकृतं वेदनास्फुरणवक्रत्वादिकम्| ग्रीवेत्यादि यस्मिन् पार्श्वेऽर्दितं तस्मिन्पार्श्वे ग्रीवादीनां वेदनेति योज्यम्| चिबुकं मुखकुहरस्याधोभागः|||४४-४६||

अर्दिताचे निदानपूर्वक लक्षण सांगतान - उच्चैः इत्यादी, उच्चैः हे बोलण्याशी संबंधित आहे. कठिण अशी सुपारी, इ फळे खात असता. विषम शयनात् म्हणजे हनुवटी इत्यादी वेडीवाकडी ठेवून झोपण्याने, ग्रीवेला व्यापून अपवर्तते म्हणजे वाकडा होतो. आदी शब्दाने गंड, नासा इ. चा समावेश करावा, चिबुक म्हणजे मुख कुहराचा अधोभाग.

मधुकोश - अर्दितमाह– उच्चैरित्यादि| अर्दयति पीडयति| अपवर्तते वक्रीभवति| चलति कम्पते| वाक्सङ्गोऽनिर्गमो वचनस्य| आदिशब्देन भ्रूगण्डादीनां ग्रहणम्| वैकृतं वेदनास्फुरणवक्रत्वादिकम्| ग्रीवेत्यादि यस्मिन् पार्श्वेऽर्दितं तस्मिन् ग्रीवादीनां वेदनेति योज्यम्| तन्त्रान्तरे तु मुखार्धवच्छरीरार्धव्यापकोऽप्यर्दितः पठितः| यदाह दृढबलः– 'अर्धे तस्मिन् मुखार्धे वा केवले स्यात्तदर्दितम्|' (च. चि. अ. २८) इति| ननु, यद्येवं तदा अर्दितार्धाङ्गवातयोः को भेदः? उच्यते– वेगित्वेनार्दिते कदाचिद्वेदना भवति, अर्धाङ्गवाते तु सर्वदैवेति भेदः; अथवा यथोक्तः सर्वाङ्गोऽर्दितः तद्विपरीतस्त्वर्धाङ्गवात इत्याहुः| सुश्रुतेन तु मुखमात्र एवार्दितः पठितः, अर्धशरीरस्यार्धाङ्गवातेन लब्धत्वात्| स एवात्र माधवेन लिखितः||४४-४६||

अर्दित सांगतात, उच्चैः इत्यादी. अर्दयति म्हणजे पीडा करतो. अपवर्तते म्हणजे वाकडा करतो, चलति म्हणजे कंपते. वाक्संग म्हणजे बोलणे बाहर न पडणे. आदी शब्दाने भुवई, गंड इ चे ग्रहण होते. वैकृत म्हणजे वेदना म्हणजे स्फुरण, वाकडे होणे ग्रीवा इ.. ज्या बाजूला अर्दित झाला असेल असेल त्या बाजूच्या ग्रीवा आदीमध्ये वेदना होते अशी योजना आहे (असे समजावे.) अन्य तंत्रामध्ये अर्धमुखाप्रमाणे अर्ध्या शरीराला व्यापणारा अर्दित व्याधी म्हटला आहे. जे दृढबल म्हणतो - "अर्धे तस्मिन्मुखार्धे वा केवले स्यात्तदर्दितम्".

खरोखर असे असेल तर अर्दित व अर्धांगवात यामध्ये भेद काय? सांगतो. वेग (क्षमता) असल्यामुळे अर्दितामध्ये कदाचित् वेदना होते. अर्धांगवातामध्ये सततच वेदना असते. हा भेद आहे, किंवा यथोक्त सर्वलिंग असा व्याधी म्हणजे अर्दित व तद्विपरीत अर्धांगवात असे म्हटले आहे.

सुश्रुताने मात्र मुखमात्रापुरताच अर्दित हा पाठ स्वीकारला आहे. कारण अर्ध शरीराचा व्याधी अर्धांगवाताने उपलब्ध होतो. तोच (पाठ) येथे माधवाने लिहिला आहे.

## अर्दितस्यासाध्यलक्षणम्



अर्दिताचे असाध्य लक्षण (सांगतात.)

क्षीणस्यानिमिषक्षस्य प्रसक्ताव्यक्तभाषिणः ||४७||
न सिध्यत्यर्दितं गाढं त्रिवर्षं वेपनस्य च |
(सु. नि. अ. १) |

क्षीण झालेल्या, डोळे बंद न होणाऱ्या, कंठ, टाळू इ जणु चिकटून बसल्यामुळे अव्यक्त भाषण करणाऱ्या (व्यक्तीचा), तीन वर्षे जुना आणि कंपयुक्त असा अर्दित सिद्ध होत नाही (बरा होत नाही.)

आ.द. - तस्यासाध्यलक्षणमाह– क्षीणस्येत्यादि|अनिमिषाक्षस्य निमेषासमर्थचक्षुषः| प्रसक्तेति प्रकर्षेण सक्तं लग्नमप्रवृत्तं, कण्ठताल्वादिवर्णोच्चारणस्थानेषु, अव्यक्तमस्फुटं पीडितवर्णपदं भाषितुं शीलं यस्य स तथा| अन्ये तु प्रसक्तं निरन्तरमाहुः; तन्न, चरके– “काले सज्जति चास्य वाक्” इति वचनात्| त्रिवर्षमिति अतीतवर्षत्रयम्, अथवा त्रयाणां मुखनासिकाचक्षुषां वर्षः स्रवणं यत्र तत्तथेत्याहुः| वेपनस्य कम्पनशीलस्य||४७||

प्रसक्त इत्यादी. प्रकर्षाने सक्त म्हणजे चिकटून बसलेला (त्यामुळे) अप्रवृत्त असा स्वर - कंठ, टाळू इ वर्णोच्चार स्थानामध्ये वेपनस्य म्हणजे कंपनशील चे.

मधुकोश - तस्यासाध्यलक्षणमाह– क्षीणस्येत्यादि| अनिमिषाक्षस्य निमेषासमर्थचक्षुषः| प्रसक्ताव्यक्तभाषिण इति प्रसक्तं प्रकर्षेण सक्तमप्रवृत्तम्, अव्यक्तं प्रपीडितवर्णपदं, भाषितुं शीलं यस्य स तथा| अन्ये तु प्रसक्तं निरन्तरमाहुः; तन्न, चरके “दीना जिह्वा समुत्क्षिप्ता काले सज्जति चास्य वाक्|” (च. चि. अ. २८) इति वचनात्| त्रिवर्षमिति अतीतवर्षत्रयम्; अथवा त्रयाणां मुखनासाचक्षुषां वर्षः स्रवणं यत्र तत्तथेत्याहुः||४७||

त्याचे असाध्य लक्षण सांगतात. क्षीणस्य इ. अनिमिष अक्ष म्हणजे ज्याचे चक्षु मिटण्यास असमर्थ आहेत अशी व्यक्ती. प्रसक्ताव्यक्तभाषिण म्हणजे प्रकर्षाने सक्त अप्रवृत्त असे बोलणे व अव्यक्त म्हणजे पीडेने उच्चारले गेले आहेत असे बोलण्याची ज्याला सवय होते ती व्यक्ती. अन्य काही जण प्रसक्त म्हणजे निरंतर असे म्हणतात. तसे (म्हणणे) नाही. कारण चरकात म्हटले आहे - "दीना जिह्वा समुत्क्षिप्ता काले सज्जति चास्य वाक्|"

त्रिवर्ष म्हणजे तीन वर्षे उलटून गेलेला किंवा जेथे तिघांचेही म्हणजे मुख, नासा, चक्षु यातून वर्षण-स्रवण होत असते असा अर्थ (करावा.)



# आक्षेपकादीनां वेगशान्तौ स्वस्थत्वम्

आक्षेपकादींचे वेग शांत (झाल्यावर) स्वास्थ्य (प्राप्तीबद्दल सांगतात.)

गते वेगे भवेत् स्वास्थ्यं सर्वेष्वाक्षेपकादिषु ||४८||
(वा. नि. अ. १५) |
सर्व आक्षेपकादी (व्याधींमध्ये) वेग गेला असता स्वास्थ्य (उत्पन्न) होते.

आ. द. -

मधुकोश - आक्षेपकादीनामर्दितान्तानां वेगित्वमाह– गत इत्यादि| स्वास्थ्यं पीडालाघवं, भारापगमे सुखित्वव्यपदेशवत्||४८||
आक्षेपक ते अर्दित यांचे वेग (याबद्दल) सांगतो. गत इत्यादी. स्वास्थ्य म्हणजे पीडा कमी होणे. (ज्याप्रमाणे) ओझे दूर झाल्यामुळे सुखी झालो असे म्हणतात, त्याप्रमाणे.



## हनुग्रहलक्षणम्

हनुग्रहाचे लक्षण (सांगतात.)

जिह्वानिर्लेखनाच्छुष्कभक्षणादभिघाततः |
कुपितो हनुमूलस्थः स्रंसयित्वाऽनिलो हनुम् ||४९||
करोति विवृतास्यत्वमथवा संवृतास्यताम् |
हनुग्रहः स तेन स्यात् कृच्छ्राच्चर्वणभाषणम् ||५०||
(वा. नि. अ. १५)

जिह्वानिर्लेखन, (अति) शुष्क भक्षण, अभिघात (इ मुळे) कुपित वायू हनुवटीच्या मुळाशी स्रंस (उत्पन्न) करून, तोंड विवृत करती (तो) हनुग्रह (होय). त्यामुळे चर्वण, भाषण (या क्रिया) कष्टदायक होतात.

आ. द. - हनुग्रहमाह– जिह्वेत्यादि| जिह्वानिर्लेखनात् जिह्वाघर्षणात् दन्तकाष्ठादिना, शुष्काणां चणकादीनां भक्षणात्| अभिघाततः ताडनात्| हनुमूलस्थः कपोलमूलस्थः| हनुं स्रंसयित्वा अधः कृत्वा, विवृतास्यत्वं प्रसारितवदनत्वं, संवृतास्यत्वं सङ्कुचितमुखताम्| अत्र संवृतिर्विवृतिर्वा वायोरनियतकारित्वात्| स एव वातः कुपित इत्यर्थः| तेन कृच्छ्राच्चर्वणं भाषणं च स्यात्||४९-५०||

जिह्वानिर्लेखनात् म्हणजे काळ इ ने जिह्वा, दंत घर्षण, शुष्क चणकादिंचे भक्षण, अभिघातात् म्हणजे ताडनामुळे, विवृतास्यत्व म्हणजे मुख प्रसारित होणे वा संवृतास्य म्हणजे मुख संकुचित होणे, येथे संवृत होणे वा विवृत होणे हे वाताच्या अनियत (स्वरूपा) मुळे होते. तोच वात कुपित (असा) त्यामुळे चावणे, भाषण हे कष्टाने होते.

मधुकोश - हनुग्रहमाह– जिह्वेत्यादि| हनुमूलस्थः कपोलमूलस्थः| हनुं स्रंसयित्वाऽधः कृत्वा| विवृतास्यत्वम् आस्यविवृतिं, संवृतास्यताम् आस्यसंवृतिं; सा च वायोरनियतकारित्वात्||४९-५०||

हनुग्रह सांगतात. जिह्वा इ. हनुमूलस्थ म्हणजे गालांच्या अधोभागी असणारा, हनुस्रंसन करून म्हणजे हनुवटी खाली (ढकलून) करून. विवृतास्य म्हणजे तोंड मोठे होणे, संवृतास्य म्हणजे तोंड संकुचित होणे. हे वाताच्या अनियत कार्यामुळे होते.

# मन्यास्तम्भलक्षणम्

मन्यास्तम्भ लक्षण (सांगतात.)

दिवास्वप्नासनस्थानविवृतोर्ध्वनिरीक्षणैः |
मन्यास्तम्भं प्रकुरुते स एव श्लेष्माणऽऽवृतः ||५१||
(सु. नि. अ. १) |

दिवसा झोपणे, विषम आसन (बसणे), तिरके (मान तिरकी करून) पाहणे (या हेतूंमुळे) कफाने आवृत वायू मान जखडतो (मन्यास्तंभ करतो.)

आ.द - मन्यास्तम्भमाह– दिवेत्यादि| आसनमुपवेशः, स्थानमूर्ध्वभवनं, विवृतोर्ध्वनिरीक्षणं वक्रमार्गावलोकनम्| स एवेति वातो दिवास्वप्नादिभिः कुपितः सन्, श्लेष्मणाऽऽवृतो मन्यास्तम्भं प्रकुरुते, मन्यास्तम्भं केचिदपतानकपूर्वरूपं मन्यन्ते||५१||

आसन म्हणजे बसणे, स्थानम् म्हणजे ऊर्ध्वभवन (वर पाहणे) विवृतोर्ध्वनिरीक्षण म्हणजे तिरके पाहणे. तोच म्हणजे दिवास्वप्न इ मुळे कुपित होऊन कफाने आवृत झालेला (वायू) मन्यास्तंभ करतो. मन्यास्तंभ करतो. काहीजण हे अपतानकाचे पूर्वरूप मानतात.

## सिराग्रहस्य सम्प्राप्तिपूर्वकं लक्षणम्

सिराग्रहाचे सम्प्राप्तिपूर्वक लक्षण (सांगतात.)

रक्तमाश्रित्य पवनः कुर्यान्मूर्धधराः सिराः |
रूक्षाः सवेदनाः कृष्णाः सोऽसाध्यः स्यात् सिराग्रहः ||५३||
(वा. नि. अ. १५) |

वाग्वाहिनी सिरांमधील (कुपित) वायू जिह्वेचा स्तंभ करतो. तो जिह्वास्तंभ (व्याधी). त्यामुळे अन्नसेवन, द्रवसेवन, बोलणे यावर ताबा राहत नाही. (कुपित) वायू रक्ताचा आश्रय करून मूर्धभागातील सिरा रूक्ष (करतो). वेदना (उत्पना करतो). (सिरा) काळ्या करतो तो सिराग्रह (व्याधी) असाध्य असतो.

आ. द. - सिराग्रहमाह– रूक्षाः सवेदनाः कृष्णा इति रूक्षकृष्णवेदनावत्त्वं कुर्यात्| सोऽसाध्य इति स्वरूपेण हस्तगतद्रव्यवत्| 'शिरोग्रहः' इति पाठान्तरं, तत्र शिरोधारकसिरादुष्ट्या शिरोवेदनाकारित्वात्, शिरोग्रहलक्षणं तु तदेव||५३||

जिह्वास्तंभ सांगतात- वायू इ. वाग्वाहिनी म्हणजे ज्या सिरा वाचेचे वहन करतात तेथे असणारा (वात) अशी (अर्थ) योजना करावी. समस्त पक्ष घेतला तर पुंवत् कर्म - या (सूत्रानुसार) पुरुषलिंग प्राप्त होत असल्याने. अन्नपानेषु म्हणजे अन्नसेवन, द्रवसेवन, बोलणे इ मध्ये सामर्थ्य न राहणे.

मधुकोश - सिराग्रहमाह– रक्तमित्यादि| मूर्धधरा इति ग्रीवागताः, तासां रूक्षत्वं वेदनावत्त्वं कृष्णत्वं च कुर्यात्| सोऽसाध्य इति स्वरूपेणैव, काकणकुष्ठवत्| शिरोग्रह इति पाठान्तरेऽपि शिरोधारकसिरादुष्ट्या शिरोवेदनाकारित्वात् 'शिरोग्रह' इति व्यपदेशः, लक्षणं तु तदेव||५३||

सिराग्रह सांगतात रक्त इत्यादी. मूर्धधरा म्हणजे ग्रीवागत. त्यांचे रूक्षत्व, कृष्णत्व (त्यामध्ये) वेदना उत्पन्न करतो. तो स्वरूपानेच असाध्य असतो. काकणकुष्ठाप्रमाणे. शिरोग्रह असा पाठ स्वीकारला तर शिरोभागातील सिरा दुष्ट झाल्यामुळे शिरोवेदना (असा अर्थ करून त्यानुसार) शिरोग्रह असा व्यपदेश करावा लागेल. लक्षण मात्र तेच.



## गृध्रसीलक्षणम्

गृध्रसी लक्षण (सांगतात.)

स्फिक्पूर्वा कटिपृष्ठोरुजानुजङ्घापदं क्रमात् |
गृध्रसी स्तम्भरुक्तोदैर्गृह्णाति स्पन्दते मुहुः ||५४||
वाताद्वातकफात्तन्द्रागौरवारोचकान्विता |
(च. चि. अ. २८) |

(कुपित) वात (स्फिक्) पासून आरंभ होऊन कंबर, पाठ, मांड्या, गुडघा, जंघा आणि पाय या क्रमाने गृध्रसी (व्याधी) स्तंभ आणि रुजा तोद यासह जखडून टाकते आणि पुन्हा पुन्हा स्पंदन होत राहते. वातकफामुळे होणारी गृध्रसी तन्द्रा, गौरव, अरोचक यांनी युक्त असते.

### गृध्रस्या विशेषलक्षणम्

गृध्रसीचे विशेष लक्षण (सांगतात.)

वातजायां भवेत्तोदो देहस्यापि प्रवक्रता |
जानुकट्यूरुसन्धीनां स्फुरणं स्तब्धता भृशम् ||५५||
वातश्लेष्मोद्भवायां तु निमित्तं वह्निमार्दवम् |
तन्द्रा मुखप्रसेकश्च भक्तद्वेषस्तथैव च ||५६||

वातज गृध्रसीमध्ये तोद होतो व देह विशेषतः वक्र होतो. जानू संधी, कटिसंधी आणि ऊरूसंधी येथे स्फुरण आणि अत्यधिक स्तब्धता (उत्पन्न होते.) वातकफात्मक गृध्रसीमध्ये अग्निमांद्य हा हेतू असतो आणि तन्द्रा, मुखप्रसेक, भक्तद्वेष हेही दिसून येते.

आ. द. - गृध्रसीमाह– स्फिगित्यादि| गृध्रसी स्तम्भरुक्तोदैः क्रमात् कटिपृष्ठोरुजानुजङ्घापदं गृह्णाति, तथा मुहुः स्पन्दते सा वातजा ज्ञेया, कथम्भूता गृध्रसी? स्फिक् पूर्वा प्रथमतो ग्राह्या स्तम्भरुक्तोदैर्यस्याः सा स्फिक्पूर्वा| ईशानस्तु पूर्वा प्रथमा गृध्रसी वातादिति योजयति| एषा च व्याख्या स्फिक्शब्दस्य नपुंसकत्वेन, 'पूर्वा स्फिक् सकटीपृष्ठ'– इत्यादिपाठेन वोपपद्यते, नान्यथा| 'स्फिक्पूर्वम्' इति पाठान्तरं जानुजङ्घापदमित्यनेन योज्यम्| क्रमादिति न युगपत्| गृध्रसी रङ्घिणीति लोके| वातादिति छेदः, वातकफारब्धा गृध्रसी, सा प्रोक्ता वातलक्षणयुक्ता तन्द्रागौरवादियुक्ताऽपि भवतीति गृध्रसीद्वयमुक्तम्||५४|| गृध्रस्याः पुनरपि विशेषलक्षणमाह– वातजायामित्यादि| सुगमम्||५५-५६||

गृध्रसी स्तंभ, रुजा, तोद (या लक्षणांनी) कटी, पृष्ठ, ऊरु, जानु, जंघा आणि पाय यांना जखडून टाकते. त्याचप्रमाणे पुन्हा पुन्हा स्पंदन करते. ती वातज जाणावी. कशा प्रकारची गृध्रसी? स्फिक् भागातून आरंभ होणारी. गृध्रसी (ला) व्यवहारात रिंघिणी म्हणतात. गृध्रसीचे पुन्हा विशेषण सांगतात. वातजाया इत्यादी. ते सोपे आहे.

मधुकोश - गृध्रसीमाह– स्फिक्पूर्वेत्यादि| स्फिक् पूर्वा प्रथमतो ग्राह्या स्तम्भरुक्तोदैर्यस्याः सा स्फिक्पूर्वा; ईशानस्तु पूर्वा प्रथमा गृध्रसी वातादिति योजयति, एषा च व्याख्या स्फिक्शब्दस्य नपुंसकत्वेन 'पूर्वा स्फिक् कटीपृष्ठ' इत्यादिना पाठेन वोपपद्यते नान्यथा| 'स्फिक्पूर्वम्' इति पाठान्तरं जानुजङ्घापदमित्यनेन योज्यम्| क्रमादिति न युगपत्| वातादिति छेदः| वातकफारब्धा गृध्रसी, सा उक्तवातलक्षणयुक्ताऽपि तन्द्रागौरवादियुक्ता भवतीति गृधसीद्वयमुक्तम्||५४||

गृध्रसी सांगतात. स्फिक् पूर्व इ. स्फिक् भाग प्रथमतः स्तंभ, रुजा, तोद यांनी जखडून जातो. म्हणून स्फिक् पूर्व. ईशान मात्र पूर्वा म्हणजे पहिली गृध्रसी वातामुळे अशी वाक्ययोजना करतो. ही व्याख्या 'पूर्वा स्फिक् कटिपृष्ठ' अशा पाठाने स्फिक् शब्दाच्या नपुंसकत्वाला (गृहित) धरले तरच उपपन्न (स्पष्ट) करतो. एरवी नाही. स्फिक् पूर्वं असे पाठांतर जानुजङ्घापदं यांना जोडून घ्यावे. क्रमाद् म्हणजे एका वेळी होत नाही. (वातामुळे हे स्पष्ट). वातकफाने गृध्रसी वातकफार्द्र असते. उक्त लक्षणांसह तंद्रा-गौरवादी युक्त सुद्धा असते. (अशा प्रकारे) दोन गृध्रसी सांगितल्या आहेत.



# विश्वाचीलक्षणम्

विश्वाची लक्षण (सांगतात.)

तलं प्रत्यङ्गुलीनां याः कण्डरा बाहुपृष्ठतः ||५७||
बाह्वोः कर्मक्षयकरी विश्वाची चेति सोच्यते |
(सु. नि. अ. १) |

हस्ततल - बोटे यांचे कंडरा बाहु आणि पृष्ठयांच्यामार्फत बाहुमध्ये कर्मक्षय घडवते. तिला विश्वाची म्हणतात.

आ.द. - कण्डरा महास्नायुः||५७||

कंडरा म्हणजे महास्नायू.

मधुकोश - विश्वाचीमाह– तलमित्यादि| तलं हस्तस्योपरिभागः, तलशब्दोऽत्र उपरिवचनः, यथा– भूतलमिति गयदासः| तेनायमर्थः– बाह्वोः पृष्ठं बाहुपृष्ठं, तत आरभ्य हस्ततलं लक्षीकृत्याङ्गुलीनां याः कण्डरास्ताः सन्दूष्य बाह्वोः कर्मक्षयकरी या सा विश्वाची| बाह्वोः कर्म ग्रहणाकुञ्चनादि, द्वित्वं चात्र सम्भवपरं, तेनैकबाहावपि भवति वातरक्तवत्| विश्वाची चेति चकारेण गृध्रसीविश्वाच्योः खल्लीसञ्ज्ञां दर्शयति, तयोरपि करमूलावमोटनकारित्वात्; यदुक्तं हारीते– “विश्वाची गृध्रसी चोक्ता खल्ली तीव्ररुजान्विता|” इति गयदासः| चक्रस्त्वाह– चरके “खल्ली तु पादजङ्घोरुकरमूलावमोटनी|” (च. चि. अ. २८) इत्यनेन विश्वाच्याः पृथगेव खल्ली पठिता, सुश्रुतेन तु खल्ली न पठितैव; नहि तेन तन्त्रान्तरोक्तसर्वविकाराः पठ्यन्ते, चरकक्तपरस्परवातावरणलक्षणमेव न पठितं; हारीतेन तु तीव्ररुजायोगाद् गृध्रसीविश्वाच्योः खल्लीत्वं पठित्वं, भवति हि धर्मान्तरयोगात् कस्यचिद्विकारस्य रोगान्तरत्वं; यथा– अष्ठीलैव प्रत्यष्ठीला, अश्मर्येव शर्करा, पाण्डुरोग एव कामलेत्यादि||५७||

विश्वाची सांगतात, तल इत्यादी. येथे तल शब्द वरचा भाग सुचवतो. जसे भूतल - असे गयदास (म्हणतो.) त्यामुळे असा अर्थ होतो - बाहूचा पृष्ठभाग म्हणजे बाहु पृष्ठ, येथून सुरुवात होऊन हाताच्या तळव्याकडे जाणाऱ्या ज्या कंडरा, त्यांना दूषित करुन बाहूचा कर्मक्षय घडवते ती विश्वाची. बाहूचे कर्म ग्रहण, आकुंचन इ येथे द्वित्वही संभवते, त्यामुळे एका बाहूलाही विश्वाची होते, जसे वातरक्त (दोन्ही किंवा एका पायालाही होते.) ‘विश्वाची च’ येथे चकाराने गृध्रसी आणि विश्वाची यांना खल्ली संज्ञा (दिली जाते) असे (दाखवतात.)

जे हारिताने म्हटले आहे - “विश्वाची गृध्रसी चोक्ता खल्ली तीव्ररुजान्विता|” असे गयदासाचे मत आहे. चक्रपाणि चरकटीकेत म्हणतो - “खल्ली तु पादजङ्घोरुकरमूलावमोटनी|”

त्यामुळे विश्वाची पेक्षा वेगळी व्याधी खल्ली असा पाठ आहे. सुश्रुताने तर खल्ली हा पाठ (स्वीकारलेला) नाही. त्याने अन्य तंत्रातील सर्व विकारांचे पाठ स्वीकारलेले नाहीत. चरकोक्त - वाताचे परस्पर आवरण लक्षण सुद्धा पाठात (स्वीकारलेले) नाही. हारिताने मात्र तीव्र रुजा (या लक्षणामुळे) गृध्रसी आणि विश्वाची यांना खल्ली म्हटले आहे. त्या व्याधीचा धर्म (स्वरूप) बदलल्यामुळे एखाद्या विकाराचे रोग म्हणून वेगळेपण (मानले आहे.) (मान्य करतात.) जसे अष्ठीला म्हणजेच प्रत्यष्ठीला. अश्मरी म्हणजे शर्करा. पाण्डुरोग म्हणजे कामला.

# क्रोष्टुकशीर्षलक्षणम्

क्रोष्टुकशीर्ष लक्षण (सांगतात.)

वातशोणितजः शोथो जानुमध्ये महारुजः ||५८||
ज्ञेयः क्रोष्टुकशीर्षस्तु स्थूलः क्रोष्टुकशीर्षवत् |
(सु. नि. अ. १) |

गुडघ्यामध्ये अत्यंत रुजा करणारा वातरक्तज असा शोथ (उत्पन होतो.) त्याला क्रोष्टुकशीर्ष (नावाने ओळखतात.) तो क्रोष्टुक (कोल्ह्याच्या) डोक्याप्रमाणे (आकाराने) मोठा असतो.

आ. द. - क्रोष्टुकशीर्षमाह– वातेत्यादि| वातशोणिताभ्यां जातो वातशोणितजः, न पुनर्वातरक्तेन व्याधिना जनितः, जानु मध्ये ऊरुजङ्घयोः सन्धिः, स्थौल्येन आकृत्या च क्रोष्टुशीर्षवत्||५८||

वात आणि रक्त यामुळे झालेला म्हणून वातशोणितज म्हणतात. वातरक्त व्याधीमुळे झालेला (असा अर्थ) नाही. जानु म्हणजे ऊरु व जंघा येथील संधी, तो (व्याधी) स्थूलतेमुळे आणि आकारामुळे कोल्ह्याच्या डोक्याप्रमाणे दिसतो.

मधुकोश - क्रोष्टुकशीर्षमाह– वातेत्यादि| वातशोणितज इति वातरक्ताख्यविकारजः, चिकित्साभेदार्थं पृथक् पठित इति गयदासः| वातशोणिताभ्यां जात इति जेज्जटः| दृश्यते ह्ययं वातरक्तव्यतिरेकेणापि; जानुदेशनियतत्वेन विशिष्टलक्षणत्वेन चेतरवातरक्तशोथाद्भेद इति| क्रोष्टुकशीर्षवत् शृगालमस्तकवत् स्थूलः||५८||

क्रोष्टुकशीर्ष सांगतात. वात इ. वात शोणितज म्हणजे वातरक्त नावाच्या विकारामुळे झालेला. चिकित्सा भेदासाठी वेगळा सांगितला आहे असे गयदास म्हणतो. वातशोणितामुळे होणारा असे जेज्जट म्हणतो, हा व्याधी वातरक्ताशिवाय ही दिसतो. गुडघ्याशी संबंधित विशिष्ट लक्षण असल्यामुळे वातरक्त व शोथ यापासून भेद (स्पष्ट केला) आहे. क्रोष्टुकशीर्षवत् म्हणजे कोल्ह्याच्या डोक्याप्रमाणे स्थूल.



# खञ्जलक्षणम्

खञ्ज लक्षण (सांगतात.)

वायुः कट्याश्रितः सक्थ्नः कण्डरामाक्षिपेद्यदा ||५९||
खञ्जस्तदा भवेज्जन्तुः पङ्गुः सक्थ्नोर्द्वयोर्वधात् |
(सु. नि. अ. १) |

कटीच्या आश्रयाने राहणारा कुपित झालेला वायू सक्थीच्या कंडरांचा जेव्हा आक्षेप करतो (खेचून घेतो) तेव्हा व्यक्ती खंज (व्याधीग्रस्त) होते. दोन्ही सक्थींचा वध (हनन/ अकार्यता) झाल्यास त्याला पंगू म्हणतात.

आ. द. - खञ्जपङ्गुवातावाह– वायुरित्यादि| यदा कट्यां स्थितो वायुः सक्थ्नः ऊर्ध्वजङ्घायाः कण्डरां महास्नायुमाक्षिपेत् ईषत् क्षिपेत् किञ्चिद्गतिमत्त्वादिति गयदासः, तदा जन्तुः खञ्जो भवति| पङ्गुः सक्थ्नोर्द्वयोर्वधादिति सर्वथा गतिविघातात् पङ्गुरिर्थः| सक्थ्नोरिति द्विवचनेनैव द्वित्वे लब्धे द्वयोरितिपदेन नियमयति– सक्थिद्वयस्यैव वधात्पङ्गुः, एकसक्थिवधात्खञ्ज इति| वधश्चात्र गमनक्रियानाशः||५९||

खंज पंगु वात सांगतात. जेव्हा कटीतील वायू सक्थीच्या कंडरांचा आक्षेप करतो तेव्हा व्यक्ती खंज होतो. 'पङ्गुः सक्थ्नोः' म्हणजे सर्वथा गतीविघात (हालचाली बंद) झाल्यामुळे पंगू होतो असा अर्थ. सक्थ्नो येथे द्विवचनानेच द्वित्व उपलब्ध होते म्हणून ते अति या पदाने नियमात बांधतात. (म्हणजे) दोन सक्थींचा विघात हा पंगू. एक सक्थीच विघात हा खनिज. वध म्हणजे चालण्याच्या क्रियेचा नाश.

मधुकोश - खञ्जमाह– वायुरित्यादि| सक्थ्नः ऊर्ध्वजङ्घायाः, कण्डरां महास्नायुम्, आक्षिपेत् ईषत् क्षिपेत्, किञ्चिद्गतिमत्त्वादिति गयदासः| सक्थ्नोरिति द्विवचनेनैव द्वित्वे लब्धे द्वयोरिति पदेन नियमयति– सक्थिद्वयस्यैव वधात् पङ्गुः, एकसक्थिवधात् खञ्ज इति; वधश्चात्र गमनादिक्रियानाशः||५९||

कलायखञ्ज लक्षण (सांगतात.)

प्रक्रामन् वेपते यस्तु खञ्जन्निव च गच्छति ||६०||
कलायखञ्जं तं विद्यान्मुक्तसन्धिप्रबन्धनम् |
(सु. नि. अ. १) |


चालताना कंप होऊन खंज आल्याप्रमाणे जो चालतो तो कलायखंज (व्याधीग्रस्त) ओळखावा. (त्यामध्ये) संधिबंध मुक्त झालेले असतात.

आ. द. - कलायखञ्जमाह– प्रक्रामन्नित्यादि| प्रक्रामन् पादविक्षेपं कुर्वन्, वेपते कम्पते| खञ्जन्निवेत्यादि वैकल्यं कुर्वन्निव गच्छति| मुक्तसन्धिप्रबन्धनं शिथिलीकृतसन्धिबन्धनम्| कलायखञ्ज इति शास्त्रे रूढिः सञ्ज्ञा||६०||

कलायखंज सांगतात. प्रक्रामन् इ. प्रक्रामन् म्हणजे पाय फेकून, वेपते म्हणजे कंप होणे.

मधुकोश - खञ्जविशेषमाह– प्रक्रामन्नित्यादि प्रक्रामन्निति गमनमारभमाणो वेपते| प्रशब्दोऽयमादिकर्मणि| खञ्जन्निव गच्छति विकलयन्निव गच्छति, गमनारम्भेन अन्येन संसृष्टं वेपते तेन खञ्जादस्य भेदः| मुक्तेत्यादिमित्याहुः| मुक्तसन्धिप्रबन्धनमिति शिथिलीकृतसन्धिबन्धनम्| कलायखञ्ज इति शास्त्रे रूढा सञ्ज्ञा; अयमेवान्यत्र खञ्जवात इत्युक्तः||६०||

खंज चा विशेष सांगतात. प्रक्रामन् इ. प्रक्रामन् म्हणजे चालण्याच्या आरंभी कंप होतो. प्र हा शब्द (उपसर्ग) चालणे इत्यादी कर्म (सुचवतो). खंजमिव म्हणजे विकल/व्याकुळ झाल्याप्रमाणे जातो. चालण्यापूर्वी कंप नसणे हा खंजपेक्षा वेगळेपणा आहे. मुक्तसंधी म्हणजे संधिबंध शिथिल (होणे.) कलायखंज ही शास्त्रात रूढ संज्ञा आहे. यालाच अन्यत्र खंजवात म्हटले आहे.



# वातकण्टकलक्षणम्

वातकण्टक लक्षण (सांगतात.)

रुक् पादे विषमेन्यस्ते श्रमाद्वा जायते यदा ||६१||
वातेन गुल्फमाश्रित्य तमाहुर्वातकण्टकम् |
(वा. नि. अ. १५) |

पाय विषम/वेडावाकडा टाकण्याने वा श्रमाने पायात गुल्फ (घोटा) भागात वाताने जी रुजा होते त्याला वातकंटक म्हणतात.

आ द - वातकण्टकमाह– रुगित्यादि| यदा विषमपादन्यासकुपितः श्रमकुपितो वा वायुर्गुल्फेवेदनां जनयति, तं वातकण्टकमित्याहुः; अयमेवान्यत्र 'खुडुकावात' इत्युक्तः||६१||

वातकंटक सांगतात. रुक् इ. जेव्हा वेडावाकडा ठेवण्याने किंवा श्रमामुळे कुपित वायू गुल्फामध्ये वेदना उत्पन्न करतो त्याला वातकंटक असे म्हणतात. यालाच अन्यत्र खुडुकावात असे म्हटले आहे.

मधुकोश - वातकण्टकमाह– रुगित्यादि| विषमपादन्यासकुपितः श्रमकुपितो वा वायुर्गुल्फे वेदनां जनयन्, वातकण्टकमित्याहुः; अयमेवान्यत्र 'खुडुकावात' इत्युक्तः||६१||

वातकंटक सांगतात. रुक् इ. जेव्हा वेडावाकडा ठेवण्याने किंवा श्रमामुळे कुपित वायू गुल्फामध्ये वेदना उत्पन्न करतो त्याला वातकंटक असे म्हणतात. यालाच अन्यत्र खुडुकावात असे म्हटले आहे.

पाददाह लक्षण (सांगतात.)

पादयोः कुरुते दाहं पित्तासृक्सहितोऽनिलः ||६२||
विशेषतश्चङ्क्रमतः पाददाहं तमादिशेत् |
(सु. नि. अ. १) |

विशेषतः (अति) चालण्यामुळे पित्त, रक्त यांसह कुपित वात पायांमध्ये दाह उत्पन्न करतो. त्याला पाददाह म्हणतात.

आ द - विशेषतश्चङ्क्रमतः विशेषेण गच्छतः||६२||

विशेषतः चंक्रमतः म्हणजे विशेष (अति) चालून.

मधुकोश - पाददाहमाह– पादयोरित्यादि| विशेषतश्चङ्क्रमत इत्यनेन स्थितस्य मन्दो दाह इति दर्शयति| वैवर्ण्यादेरभावाद्वातरक्तादस्य भेदः||६२||


पाददाह सांगतात पादयो इ.विशेषतः चालण्यामुळे म्हणजे स्थिर असता मंद दाह असतो असा अर्थ. वैवर्ण्य इ लक्षणांच्या अभावी याचा वातरक्तापासून भेद/ वेगळेपणा (स्पष्ट) आहे.

पादहर्ष लक्षण (सांगतात.)

हृष्येते चरणौ यस्य भवेतां चापि सुप्तकौ ||६३||
पादहर्षः स विज्ञेयः कफवातप्रकोपतः |
(सु. नि. अ. १) |
ज्याचे तळपाय हर्षित होतात (मुंग्या येतात) आणि गळून जातात अशा कफवातप्रकोपजन्य (व्याधी) ला पादहर्ष म्हणतात.

आ द -

मधुकोश - पादहर्षमाह– हृष्येते इत्यादि| हृष्येते हर्षयुक्तौ भवतः, हर्षश्च रोमाञ्चप्रायः अन्तःशीतो झिणिझिणिवत् वेदनाविशेष इत्याहुः; झिणिझिणि तु न चिरानुबन्धिनी केवलवातजेति भेदः||६३||
पादहर्ष सांगतात हृष्येत इ.
हृष्येत म्हणजे हर्षयुक्त होतात (मुंग्या येतात). हर्ष म्हणजे विशेषतः रोमांचवत् येणारी. आतमध्ये शीत अशी झिणिझिणिप्रमाणे वेदना. झिणिझिणि ही दीर्घकाळ नसते. केवळ वातज हा त्या दोन्हीतील भेद आहे.




# अंसशोषलक्षणम्

अंसशोष लक्षण (सांगतात.)

अंसदेशस्थितो वायुः शोषयेदंसबन्धनम् ||६४||
(सु. नि. अ. १) |
अंसदेशातील वायू (कुपित झाला असता) अंससंधीचे बंधांचे शोषण करतो.

आ द - अर्धार्धश्लोकेनांसशोषावबाहुकयोर्लक्षणमाह– अंसेत्यादि| अंसशब्देनांससमीपोपलक्षितदेशोंऽसदेशः| अंसो बाहुशिरः, तत्र स्थितो व्यवस्थितः| अंसबन्धनमिति अंसबन्धनकारकः श्लेष्मा अंसबन्धनः, तत्रांसबन्धनं श्लेष्माणं शोषयित्वा स तदनन्तरं अंसशोषं जनयेदिति वाक्यशेष इति कार्तिकः||६४||
अर्ध्या श्लोकाने अंसशोष लक्षण सांगतात. अंस इ. अंस शब्दाने अंससंधी जवळपासचा शरीर भाग म्हणजे अंसदेश (असे समजावे.) अंस म्हणजे बाहूचे शिर. तेथे स्थित म्हणजे असलेला. अंसबंधन करणारा श्लेष्मा त्याचे शोषण करून.

मधुकोश - अंसेत्यादि| अंसेत्यादिना श्लोकार्धेनांसशोषः केवलवातज उच्यते| अंसबन्धनकारकः श्लेष्मा अंसबन्धनः; एतदनन्तरं 'अंसशोषं जनयेत्' इति शेष इति कार्तिकः||६४||
अंस इ.. अर्धश्लोकाने अंसशोष हा केवळ वातज (असे) म्हणतात. अंसबंधन करणारा श्लेष्मा अंसबंधनकारक. यानंतर अंसशोष करतो (असे) शेष (वाक्य) जाणावे असे कार्तिक (म्हणतो).



# अवबाहुकलक्षणम्

अवबाहुक लक्षण (सांगतात.)

सिराश्चाकुञ्च्य तत्रस्थो जनयेदवबाहुकम् |६५|
(सु. नि. अ. १) |
तिथलाच (अंस भागातील) वायू सिरांचे आकुंचन करून अवबाहुक उत्पन्न करतो.

आ.द. - अयं च कफवातजः| अत्रांसशोषमवबाहुकमिति रोगद्वयमुक्तवान्|६५|–
हा कफवातज असतो. येथे अंसशोष व अवबाहुक असे दोन रोग सांगितले आहेत.

मधुकोश - अवबाहुकमाह– सिराश्चेत्यादिना| तत्रस्थोंऽसदेशस्थः| अयं च वातकफजः| अन्ये तु मिलित्वा अवबाहुकलक्षणमाहुः; तन्न, यतः सुश्रुतेनोक्तम्– 'अंसशोषावबाहुकयोर्बाहुमध्ये सिराव्यधः' (सु. शा. अ. ८) इति| एतदनन्तरं सुश्रुतेन बाधिर्यं पठितम्– "यदा शब्दवहं वायुः" (सु. नि. अ. १) इत्यादिना, माधवेन तु प्रकरणानुरोधं मन्यमानेन कर्णरोग एव तत् पठितं, किन्तु सुश्रुतेन वातव्याधौ बाधिर्यं पठित्वाऽपि बाधिर्यकर्णशूलौ शालाक्यऽपि पठितौ; पुनरुक्तमिति चेत्; नैव, सम्प्राप्तिभेदभिन्नत्वात्; वातव्याधौ शब्दवहमित्यनेन कर्णशष्कुल्यवच्छिन्ननभोदेश उक्तः, शालाक्ये च शब्दवहाः सिरा इत्युक्तम्| माधवेन तु कर्णरोगे शब्दाश्रवणत्वाविशेषादेतदेव तत्र पठितमित्यविरोधः|६५|–
अवबाहुक सांगतात. सिरा इत्यादी. तत्रस्थ म्हणजे अंसदेशातील, (वायू) सिरांचे आकुंचन करून अवबाहुक उत्पन्न करतो हा कफवातज (व्याधी) आहे. अन्य काही जण (वरील श्लोकार्थासह) मिळून अवबाहुकाचे लक्षण (होते) असे सांगतात. तसे (म्हणणे योग्य) नाही. ज्याअर्थी सुश्रुताने 'अंसशोषावबाहुकयोर्बाहुमध्ये सिराव्यधः' असे सांगितले आहे. यानंतर श्लोक- सुश्रुताने बाधिर्य लिहिला आहे, "यदा शब्दवहं वायुः".

याने माधवाने मात्र प्रकरणाचा अनुरोध (संगती) मान्य करून कर्णरोगातच लिहिला आहे. परंतु सुश्रुताने वातव्याधीमध्ये बाधिर्य लिहून सुध्दा शालाक्यातही बाधिर्य, कर्णशूल लिहिले आहेत. (हे) पुनरुक्त म्हणाल तर तसे नाही कारण सम्प्राप्तीमधील बारकावे वेगवेगळे आहेत. वातव्याधीमध्ये 'शब्दवह' याने कर्णशष्कुलीपेक्षा वेगळा आकाशीय प्रदेश सांगितला आहे. शालाक्यामध्ये शब्दवहा सिरा असे सांगितले आहे. माधवाने मात्र कर्णशूलामध्ये शब्द ऐकू न येणे असे काही विशेष नसल्यामुळे हेच तेथे लिहिले आहे. त्यामुळे विरोध येत नाही.

# मूकादीनां लक्षणम्

मूकादींचे लक्षण (सांगतात.)

आवृत्य वायुः सकफो धमनीः शब्दवाहिनीः ||६५||
नरान् करोत्यक्रियकान्मूकमिन्मिनगद्गदान् |
(सु. नि. अ. १) |

शब्दवाहिनी धमनीला आवरण करून कफासहित वायू मनुष्याला (बोलण्याच्या बाबतीत) क्रियाहीन करतो - मूक, मिन्मिन, गद्गद (हे व्याधी उत्पन्न करतो.)

आ. द. - मूकादीन् जिह्वागतान् वातरोगांस्त्रीनाह– आवृत्येत्यादि| वायुः सकफः कुपितः सन्, शब्दवाहिनीर्धमनीरावृत्यावरुध्य, नरान् अक्रियकान् अवचनक्रियकान् करोति|||६५||

मूक इत्यादी तीन जिह्वागत वातरोग सांगतात. आवृत्य इत्यादी. वायू कफासहित कुपित झाला असता शब्दाहिनी धमनीला आवृत्त-आवरण करून मनुष्याला अक्रिय करतो.

मधुकोश - मूकादींस्त्रीनाह– आवृत्येत्यादि| अक्रियकान् अवचनक्रियकानिति; नञयमभावे, ईषदर्थे च| आद्यो मूकोऽवचनः, द्वितीयो मिन्मिनः सानुनासिकसर्ववचनः, तृतीयो गद्गदो लुप्तपदव्यञ्जनाभिधायी| एषां च समानकारणाभिधानेऽपि दुष्टेरुत्कर्षादिभिरदृष्टवशाद्वा भेद इत्युन्नेयम्||६५||

मूकादि तीन (रोग) सांगतात. आवृत्य इत्यादी. अक्रिय म्हणजे वचनक्रिया (बोलणे) होऊ देत नाही. येथील नकार अभावासाठी आणि ईषदर्थे (अल्पत्व सुचवण्यासाठी ) आहे. पहिला (व्याधी) मूक म्हणजे बोलणे होत नाही. दुसरा मिन्मिन म्हणजे सर्व बोलणे सानुनासिक होते. तिसरा गद्गद म्हणजे लुप्त पद किंवा व्यंजन बोलणे, यांच्यामध्ये समान हेतू सांगून सुध्दा दुष्टीच्या उत्कर्षामुळे (गांभीयामुळे) किंवा अदृष्ट मुळे भेद असे जाणावे.

टीप - अदृष्ट ही मीमांसकांची संकल्पना आहे. त्यालाच अपूर्व असेही म्हटले आहे. कोणत्याही क्रियेचे एक अदृश्य असे फल तयार होत असते अशी मीमांसकांची भूमिका आहे. विशेषतः यज्ञयागाच्या बाबतीत प्रत्येक छोट्या छोट्या क्रियेचे अपूर्व तयार होते, त्याला अंगापूर्व म्हणतात आणि यागच्या अशा सर्व क्रियाचे मिळून संकलित जे अपूर्व तयार होते त्याला फलापूर्व असे म्हणतात. प्रस्तुत् मूक, मिन्मिन्, गद्गद या संदर्भात विचार करताना वाताचा प्रकोप, कफाचा प्रकोप, शब्दवाहिनी धमनीचे मूलतः असलेले किंवा वातकफामुळे झालेले दौर्बल्य, संपूर्ण हेतुसातत्य, बीजदोषादी विकृती या सर्वांची जी समीकरणे तयार होतात त्यानुसार व्यक्ती मूक, निन्मिन किंवा गद्गद होतो असे अदृष्टवश या शब्दाच्या योजनेने सुचवायचे आहे.



## तूनीलक्षणम्

तूनी लक्षण (सांगतात.)

अधो या वेदना याति वर्चोमूत्राशयोत्थिता ||६६||
भिन्दतीव गुदोपस्थं सा तूनी नाम नामतः |
(सु. नि. अ. १) |

पुरीषाशय आणि मूत्राशयातून उत्पन्न वेदना अधोभागी जाते आणि गुद आणि उपस्थ यांचा जणू भेद करते. त्या (वेदने)ला तूनी असे नाव आहे.

आ द - तूनीवातमाह– अध इत्यादि| या वेदना शूलमध इति गुदोपस्थं याति, नामतः प्रसिद्धितः सा तूनी नाम, भिन्दतीव गुदोपस्थमिति भेदं कुर्वतीव गुदोपस्थस्येत्यर्थः||६६||

जी वेदना, शूल अधोभागी म्हणजे गुद व उपस्थाकडे जाते ती तूनी या नावाची. भिन्दतीव म्हणजे जणू उपस्थाचा भेद करते असा अर्थ.

मधुकोश- तूनीमाह– अध इत्यादि| अध इति गुदोपस्थम्| वेदना शूलम्| वर्चोमूत्राशयोत्थिता पक्वाशयमूत्राशयोत्थिता, पक्वाशयमूत्रपुटयोर्व्यस्तसमस्तयोर्जाता| उपस्थं स्त्रीपुंसयोर्गुह्यम्| नामतः प्रसिद्धितः||६६||

अध म्हणजे गुद आणि उपस्थ येथे वेदना म्हणजे शूल. वर्चोमूत्राशयोत्थिता म्हणजे पक्वाशय मूत्राशयात उत्पन्न झालेली. पक्वाशय - मूत्राशय यापैकी एकात वा दोन्हीमध्ये. उपस्थ म्हणजे स्त्री पुरुषाचा गुह्य भाग. नामतः म्हणजे प्रसिद्ध आहे.

# प्रतितूनीलक्षणम्

प्रतितूनीचे लक्षण (सांगतात.)

गुदोपस्थोत्थिता या तु प्रतिलोमं प्रधाविता ||६७||
वेगैः पक्वाशयं याति प्रतितूनीति सोच्यते |
(सु. नि. अ. १) |

गुदात उपस्थित होऊन जी प्रतिलोम धावते (वेगाने) पक्वाशयाकडे जाते तिला (वेदनेला) प्रतितूनी म्हणतात.

आ द - प्रतितूनीमाह– गुदेत्यादि| गुदोपस्थोत्थिता सैव वेदना प्रतिलोमित्यूर्ध्वं प्रधाविता सती, वेगैर्वातकृतोद्गमैर्मुहुर्मुहुः स्वभावोपशमोपलक्षितैः पक्वाशयं याति, सा प्रतितूनीत्युच्यते||६७||

गुदात उपस्थित होऊन तीच प्रतिलोम धावली असता - वाताने केलेल्या वेगामुळे पुन्हा पुन्हा होणारी स्वभावतःच उपशय (पावण्याच्या) लक्षणाची (जी वेदना) पक्वाशयाकडे जाते तिला प्रतितूनी म्हणतात.

मधुकोश - प्रतितूनीमाह– गुदेत्यादि| प्रतिलोममित्यूर्ध्वम्| वेगैर्वातकृतोद्गमैः| सेत्यनेन 'भिन्दतीव' इत्यतिदिश्यते||६७||

प्रतितूनी सांगतात. प्रतिलोम म्हणजे ऊर्ध्व दिशेला, वेगैः म्हणजे वाताने सुरू केलेली. सेति या (पदाने) भिन्दतीव' याचा अतिदेश सांगतात. (प्रतितूनीनेही गुद, उपस्थ येथे जणू भेद होतो असे सूचित करतात.)

## आध्मानलक्षणं, प्रत्याध्मानलक्षणं च

आध्मान व प्रत्याध्मान (सांगतात.)

साटोपमत्युग्ररुजमाध्मातमुदरं भृशम् ||६८||
आध्मानमिति तं विद्याद् घोरं वातनिरोधजम् |
विमुक्तपार्श्वहृदयं तदेवामाशयोत्थितम् ||६९||
प्रत्याध्मानं विजानीयात् कफव्याकुलितानिलम् |
(सु. नि. अ. १) |


(ज्यामध्ये) आटोपासह अति उग्ररुजा (असते), उदर खूप आध्मात (पखालीप्रमाणे फुगलेले) असते त्या (घोर) वातनिरोधक व्याधीला आध्मान म्हणतात. त्याचप्रमाणे (तशीच घटना) पार्श्व आणि हृदय वगळता आमाशयातून (आरंभ) होते त्या काफावृत्त वातज (व्याधी) ला प्रत्याध्मान म्हणतात.

आ द - साटोपादिलक्षणयुक्तमुदरमाध्मानं जानीयात्; साटोपमिति आटोपश्चलनं तेन सह वर्तत इति साटोपमिति गयदासः| प्रत्याध्मानमाह– विमुक्तेत्यादि| विमुक्तं पार्श्वहृदयं येन तत्तथा||६८-६९||

आटोप इत्यादी लक्षणांनी युक्त असे उदर (म्हणजे) आध्मान जाणावे. साटोप म्हणजे - आटोप - चलन त्यासह असते म्हणून आटोप असे गयदास (म्हणतो). प्रत्याध्मान सांगतात. विमुक्त इत्यादी. पार्श्व आणि हृदय वगळून जो भाग त्याप्रमाणे.

मधुकोश - आध्मानमाह– साटोपमित्यादि| साटोपमिति आटोपश्चलचलनमिति गयदासः, गुडगुडाशब्द इति कार्तिकः| आध्मातं वातपूर्णचर्मपुटकस्थानीयम्| उदरमिति पक्काशयः, प्रत्याध्मानस्य आमाशयसम्भवत्वात्| घोरमिति कष्टप्रदम्| आमाशयसमुत्थत्वेन प्रत्यासत्त्या पार्श्वहृदययोरपि वेदानाशङ्कानिरासार्थमाह– विमुक्तेत्यादि| तदेवेत्यनेन साटोपादित्वमतिदिशति| कफव्याकुलितानिलं कफावृतवातम्||६८-६९||

आध्मान सांगतात. आटोप इत्यादी. आटोप म्हणजे चलन - त्यासहित असे गयदास म्हणतो. गुडगुड असा आवाज असे कार्तिक म्हणतो. आध्मात म्हणजे चामड्याच्या पखालीत/पिशवीत वात भरल्याप्रमाणे. उदर म्हणजे पक्वाशय. प्रत्याध्मान हे आमाशय संभव असल्यामुळे घोर म्हणजे कष्टदायक. आमाशयसमुत्थ असल्यामुळे प्रत्यासत्तीने (जवळ असणे) पार्श्व हृदय यांच्या वेदनेचीही शंका दूर करण्यासाठी सांगतात - विमुक्त इत्यादी. तदेव इ ने आटोप सांगून अतिदेश केला आहे. कफव्याकुल अनिल म्हणजे कफावृत वात.



## अष्ठीलालक्षणं, प्रत्यष्ठीलालक्षणं च

अष्ठीलालक्षण व प्रत्यष्ठीलालक्षण (सांगतात.)

नाभेरधस्तात् सञ्जातः सञ्चारी यदि वाऽचलः ||७०||
अष्ठीलावद्घनो ग्रन्थिरूर्ध्वमायत उन्नतः |
वाताष्ठीलां विजानीयाद्बहिर्मार्गावरोधिनीम् ||७१||
एतामेव रुजोपेतां वातविण्मूत्ररोधिनीम् |
प्रत्यष्ठीलामिति वदेज्जठरे तिर्यगुत्थिताम् ||७२||
(सु. नि. अ. १) |

नाभीच्या अधो भागापासून उत्पन्न झालेली संचारी किंवा स्थिर (गोल) दगडाप्रमाणे घन गाठ, ऊर्ध्वभागी आयत उन्नत (अशी) वाताष्ठीला जाणावी (जी) बाह्यमार्गाचा (मूत्र मार्गाचा) अवरोध करते. हीच रुजायुक्त, वात, मल-मूत्र अवरोध करणारी जठरामध्ये तिरपी उत्थित (असलेली गाठ) प्रत्यष्ठीला असे (जाणावे).

आ द - घनं संहतावयवम्||७०-७२||
घन म्हणजे अवयवाला (संहत) लागून.

मधुकोश - अष्ठीलामाह– नाभेरित्यादि| अष्ठीला उत्तरापथे वर्तुलः पाषाणविशेष इति जेज्जटमतानुवादी कार्तिकः, कर्मकाराणां वर्तुला दीर्घा लौहभाण्डीति गयदासः| ऊर्ध्वमायत उपरिदीर्घः| उन्नतः तिर्यगुन्नतः| वातकृता अष्ठीला वाताष्ठीलेति स्वरूपपरं, व्यावृत्त्यभावात्| बहिर्मार्गावरोधिनीं वातमूत्रपुरीषावरोधिनीम्| एतामित्यादि सैव जठरे तिर्यगुत्थिता तिर्यगायता प्रत्यष्ठीलेति भेदः| वातविण्मूत्ररोधिनीमिति विशेषपरम्||७०-७२||

अष्ठीला सांगतात. नाभे इ.. अष्ठीला उत्तरमार्गात वर्तुळ पाषाण-विशेष (आहे) असे जेज्जट मताचे अनुमोदन (करणारा) कार्तिक (म्हणतो). कर्मकारांची (कामगारांची) गोल मोठी लोखंडाची कढई (भांडे) असे गयदास (म्हणतो). वरती आयत (म्हणजे) वरती मोठी. उन्नत (म्हणजे) तिरपी उंच. वातकृत अष्ठीला वाताष्ठीला असे असे दुसरे स्वरूप, व्यावृति (बाहेर येणे) च्या अभावामुळे. बहिर्मार्गावरोधिनी म्हणजे वातमूत्रपुरीष यांना अवरोध करणारी. यांचे इत्यादी तीच जठरामध्ये तिरपी उठलेली तिरपी मोठी प्रत्यष्ठीला असा भेद आहे. वातविण्मूत्ररोधिनी हे विशेष (आहे).

## बस्तौ प्रतिलोमे वायौ विविधमूत्ररोधकविकारसम्भवः

बस्तीमध्ये वायू प्रतिलोम (झाला असता) मूत्ररोधक विविध विकार संभवतात.

मारुतेऽनुगुणे बस्तौ मूत्रं सम्यक् प्रवर्तते |
विकारा विविधाश्चात्र प्रतिलोमे भवन्ति च ||७३||
(सु. नि. अ. ३) |

वायू अनुलोम असताना बस्तीमध्ये मूत्राचे योग्य प्रवर्तन होते. (निर्मिती होते.) (तो वायू) प्रतिलोम (झाला असता) विविध विकार (निर्माण) होतात.

आ द - अष्ठीलाव्यतिरिक्तामपि मूत्ररोधिनीं वातविकृतिमाह– मारुत इत्यादि| अविगुणेऽनुलोमे मारुत इत्यर्थः| विकाराः अश्मरीमूत्रकृच्छ्रवातकृताष्ठीलाकृच्छ्रादयः||७३||

अष्ठीला व्यतिरिक्त सुद्धा मूत्ररोध करणारी वातविकृती सांगतात - मारुत इत्यादी. अनुगुण म्हणजे अनुलोम. प्रतिलोमे म्हणजे प्रतिलोम वात (असताना) असा संबंध (आहे). विकार अश्मरी, मूत्रकृच्छ्र, वातकृताष्ठीला इत्यादी.

मधुकोश - अष्ठीलाव्यतिरिक्तामपि वातविकृतिं मूत्ररोधिनीमाह– मारुत इत्यादि| अनुगुणेऽनुलोमे| प्रतिलोमे प्रतिलोमगे मारुत इति सम्बन्धः| विकारा अश्मरीमूत्रकृच्छ्रादयः||७३||

अष्ठीला व्यतिरिक्त सुद्धा मूत्ररोध करणारी वातविकृती सांगतात - मारुत इत्यादी. अनुगुण म्हणजे अनुलोम. प्रतिलोमे म्हणजे प्रतिलोम वात (असताना) असा संबंध (आहे). विकार अश्मरी, मूत्रकृच्छ्र इत्यादी.



# खल्लीलक्षणम्, ऊर्ध्ववातलक्षणं च

खल्लीलक्षण व ऊर्ध्ववातलक्षण (सांगतात.)

खल्ली तु पादजङ्घोरुकरमूलावमोटनी ||७४||
(च. चि. अ. २८) |

पाय, जंघा आणि गोड्या यांचे अवमोटन ( करणारी स्थिती म्हणजे) खल्ली.

ऊर्ध्ववातलक्षणम्

ऊर्ध्ववातलक्षण (सांगतात.)

अधः प्रतिहतो वायुः श्लेष्मणा मारुतेन वा |
करोत्युद्गारबाहुल्यमूर्ध्ववातः स उच्यते ||७५||

कफाने वा वाताने प्रतिहत झालेला अधो (भागी स्थित) वात, उद्गारबाहुल्य (उत्पन्न) करतो त्याला ऊर्ध्ववात म्हणतात.

आ. द. - खल्लीमाह– खल्लीत्यादि| मोटिनीति परिवर्तनशीला||७४|| ऊर्ध्ववातमाह– अध इति||७५||

खल्ली सांगतात - मोटनी म्हणजे परिवर्तनशील. उर्ध्ववात सांगतात - अध इ.

मधुकोश - खल्लीत्यादि| खल्ली ‘सिरावमोटन’ इति लोके||७४||अधः प्रतिहतो वायुः श्लेष्मणा मारुतेन च| करोत्युद्गारबाहुल्यमूर्ध्ववातं प्रचक्षते||७५||

खल्ली सिरावमोटन असे लोकात (रूढ) नाव आहे. अधः प्रतिहतो. हा श्लोक येथे काहीजण अधिक वाचतात. (स्वीकारतात.)

स्थाननामानुरूपैश्च लिङ्गैः शेषान् विनिर्दिशेत् |
सर्वेष्वेतेषु संसर्गं पित्ताद्यैरुपलक्षयेत् ||७६||
(च. चि. अ. २८) |
हनुस्तम्भार्दिताक्षेपपक्षाघातापतानकाः |
कालेन महता वाता यत्नात् सिध्यन्ति वा न वा ||७७||
नरान् बलवतस्त्वेतान् साधयेन्निरुपद्रवान् |
(च. चि. अ. २८) |

स्थान नाम अनुरुप लक्षणांनी इतर (अनुक्त वात) व्याधींचा विचार करावा. या सर्वामध्ये पित्तादिच्या संसर्गाकडे लक्ष द्यावे.
हनुस्तंभ अर्दित आक्षेपक, पक्षाघात, अपतानक हे दीर्घ काळात सिद्ध (बरे) होतात वा होत नाहीत. बलवान व्यक्ती आणि उपद्रवरहित असे व्याधी सिद्ध होतात (बरे) होतात.

आ.द - पित्ताद्यैरिति पित्तश्लेष्मरुधिरैः, संसर्गं द्विदोषजं च लक्षयेत्| उक्तरोगाणां कृच्छ्रसाध्यत्वमाह– हन्वित्यादि| एतेष्वेकः कश्चिन्मुच्यते इत्यर्थः| परं कः सिद्ध्यति, य तरुणो भवति| तथा निरुपद्रवान् उपद्रवरहितान्||७६-७७||

पित्तादि म्हणजे पित्तश्लेष्मरुधिर यांचा संसर्ग सन्निपात पहावा. उक्तरोगांचे कृच्छ्रसाध्यत्व सांगतात - हनु इ. यापैकी एक - पण कोणता सिद्ध (ठीक) होतो? जो तरुण (नवीन) असतो, जो उपद्रवरहित असतो.

मधुकोश - अनुक्तवातरोगसङ्ग्रहणार्थमाह– स्थानेत्यादि| स्थानानुरूपैर्लिङ्गैर्यथा– कुक्षिशूलं, पृष्ठशूलं, नखभेद इत्यादि| नामानुरूपैर्लिङ्गैर्यथा– शूलमित्युक्ते कीलनिखातवद्वेदनाविशेष एव उच्यते, तथा भेदतोदादिभिरपि पीडाविशेष एव गम्यते| वाता इति वातविकाराः, कार्यकारणयोरभेदोपचारात्| वातादिति पाठे तु वाताद्ये पक्षवधादय इति योज्यम्||७६-७७||

अनुक्त वातरोग सांगतात. पित्तादिच्या संसर्गाकडे. स्थानानुरूप जसे कुक्षिशूल, नखभेद इ नामानुरूपलिंग जसे शूल म्हणजे खिळा (निखात) - यांनी टोचल्याप्रमाणे वेदनांमुळे (समजून घ्यावे) तसेच भेद तोद यांनीही पीडाविशेष समजतो. वातादिति पाठाने पक्षवध इ असे जाणावे.

## पूर्वोक्तवातरोगाणां साध्यासाध्यविचारः, उपद्रवाश्च

पूर्वोक्त वातरोगांचा साध्यासाध्यविचार व उपद्रव (सांगतात.)

विसर्पदाहरुक्सङ्गमूर्छारुच्यग्निमार्दवैः ||७८||
क्षीणमांसबलं वाता घ्नन्ति पक्षवधादयः |
शूनं सुप्तत्वचं भग्नं कम्पाध्माननिपीडितम् |
रुजार्तिमन्तं च नरं वातव्याधिर्विनाशयेत् ||७९||
(सु. सू. अ. ३३) |

विसर्प, दाह, रुजा, संग, मूर्च्छा, अरुची, अग्निमार्दव (या लक्षणांनी युक्त) क्षीणमांसबल असे पक्षवधादी वातव्याधी (रोग्याचा) नाश करतात. शोथयुक्त, त्वचेची सुप्ती, स्पर्शज्ञान नसणे, भग्न, कंप, आध्मान यांनी पीडलेला, रुजा आणि अर्ति यांनी युक्त अशा मनुष्याचा वातव्याधी विनाश करतात.

आ. द. - सङ्गो मूत्रपुरीषवाताप्रवृत्तिः| क्षीणं मांसबलं यस्य स तथा| असाध्यमाह– शूनमित्यादि| शूनं शोथयुक्तम्| सुप्तत्वचं स्पर्शानभिज्ञत्वगिन्द्रियम्| भग्नं भग्नास्थि| रुजार्तिमन्तमतीव पीडयाऽऽर्तम्||७८-७९||

संग म्हणजे मूत्र-पुरीष-वात यांची अप्रवृत्ती. क्षीण झाले आहे मांस आणि बल यांचे ज्याचे तो. भग्न म्हणजे अस्थिभग्न. रुजार्तिमंत म्हणजे अतीव पीडेने आर्त (दुःखी) झालेला.

मधुकोश - वातोपद्रवानाह– विसर्पेत्यादि| वाता इति वातविकाराः, कार्यकारणयोरभेदोपचारात्| वातादिति पाठे तु वातात् पक्षवधादय इति योज्यम्| शूनमित्यादि शूनं सशोथम्| सुप्तत्वचं स्पर्शानभिज्ञत्वगिन्द्रियम्||७८-७९||

वात म्हणजे वातविकार. कार्यकारण यामध्ये अभेद असल्यामुळे (वात हाच वातविकारांना कारणीभूत असल्यामुळे) वातार्दित पाठ स्वीकारला तर जे पक्षवधादि (व्याधी) ते अशी पद योजना करावी. शून म्हणजे सूज असलेला (रुग्ण) सुप्तत्वच म्हणजे त्वचा इंद्रियाला स्पर्श न कळणे.

प्रकृतिस्थ वायूची लक्षणे व कार्य (सांगतात.)

अव्याहतगतिर्यस्य स्थानस्थः प्रकृतिस्थितः |
वायुः स्यात् सोऽधिकं जीवेद्वीतरोगः समाः शतम् ||८०||
(च. चि. अ. २८) |

गती अव्याहत आहे, (जो) (त्याच्या) ठिकाणी (आणि) प्राकृत स्थितीमध्ये आहे असा वायु पुरुषाच्या शरीरात असेल तर तो पुरुष निरोगी राहून शंभराहून अधिक वर्षे जीवित राहतो.

आ. द. -

मधुकोश - इदानीं पञ्चविधस्यापि प्रकृतिस्थस्य वायोर्लिङ्गं कार्यं चाह– अव्याहतेत्यादि| यस्येति पुरुषस्य, अव्याहतगतिः अनवरुद्धमार्गः, स्थानस्थः स्वाश्रयव्यवस्थितः, प्रकृतिस्थितोऽक्षीणश्चाप्रवृद्धः, एतद्विशेषणत्रयं हेतुहेतुमद्भावेन योज्यम्| वीतरोगो नीरोगः, कफपित्तदुष्टेरपि प्रेरकवातेनान्तरीयकत्वात्| अधिकं समाः शतमिति पञ्च दिनाधिकं सविंशं वर्षशतम्| यदाह वराहः आयुर्निरूपणे– 'समाः षष्टिर्द्विघ्ना मनुजकरिणां पञ्च च निशाः|' इत्यादि||८०||

आता प्रकृतिस्थ असलेल्या पाचही वातांची लक्षणे - कार्ये सांगतो. अव्याहत इ यस्य म्हणजे ज्या पुरुषाच्या अव्याहत गती म्हणजे अवरुद्ध न झालेला मार्ग. स्थानस्थ म्हणजे स्थानांमध्ये स्थिती असणारा, प्रकृतिस्थ म्हणजे क्षीण न झालेला. न वाढलेला हे विशेषण हेतु-हेतुमत् भावाने ध्यावे. वीतरोग म्हणजे निरोग. कफपित्तदुष्टी होऊनही प्रेरक वात -

अधिक समाः शत म्हणजे शंभरपेक्षा अधिक वीस वर्ष आणि पाच दिवस जे वराहाने आयु निरूपणात सांगितले आहे.

# पुष्पिका

इति श्रीमाधवकरविरचिते माधवनिदाने वातव्याधिनिदानं समाप्तम् ||२२||
अशा प्रकारे विजयरक्षितकृत मधुकोशव्याख्येतील वातव्याधि निदान समाप्त (झाले).

अधिक संदर्भार्थ ग्रंथ, app, links

१) माधवनिदान प्रथमाध्याय - टीकावाचन तथा विवरण - www.charakshree.com

२) नवीन रोग व आयुर्वेद book - amazon.com

३) आमाशयगत वात - www.charakshree.com

४) टीकावाचन - YouTube (https://youtu.be/yI4Ldp_75Dw)

५) Canvas of Shatkriyakal - YouTube (https://youtu.be/mN9hWzZYnJo)

६) From SHADOWS to DIAGNOSIS - Dr. Mangesh Deshpande (First Edition)